www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक

# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक २१७ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, सोमवार, १३ जानेवारी २०२५ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118



■ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या हाती पुन्हा रिक्षाचे स्टेरिंग, शिंदे यांनी दिला...

पान ३ वर....




■ अभिनेता सयाजी-मित्रवर्य शिवाजीच्या गप्पांनी जागतिक...

पान ६ वर....

## “सर्वसामान्यांसाठी राज्यात परवडणारी घरे उभारण्याचा आमचा अजेंडा”, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची माहिती

● ठाणे, रोहित जैसवार :

**सर्वसामान्य नागरिक, काम करणाऱ्या महिला, शिक्षणासाठी येणारे विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिक अशा सर्वांसाठी संपूर्ण राज्यात परवडणारे घरी उभारण्याचा आमचा अजेंडा आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी ठाण्यातील कार्यक्रमात बोलताना दिली. तसेच सरकारच्या शाळा दत्तक घेऊन तेथील शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न करा, असे आवाहनही त्यांनी उद्योगपती गौतम सिंघानिया यांना केले.**



'रेमंड कंपनी आणि सुपर क्लब आयोजित 'ऑटोफेस्ट-२०२५' या ऑटो कार फेस्टिव्हलचे उदघाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते रविवारी झाले. यावेळी त्यांनी स्पोर्ट्स बाईक आणि रिक्षा चालवण्याचा आनंद लुटला. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि उद्योगपती गौतम सिंघानिया यांच्यासह नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. नगरविकास आणि गृहनिर्माण अशी दोन्ही खाती माझ्याकडेच आहेत. त्यामुळे घरांसंबंधी कायदा करणे आणि त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी माझ्याकडेच आहे. सर्वसामान्य नागरिक, काम करणाऱ्या महिला, शिक्षणासाठी येणारे विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिक अशा सर्वांना परवडणारी घरे उपलब्ध करून देणे. त्यासाठी ठाणे, मुंबई, मुंबई महानगर आणि संपुर्ण राज्यात परवडणारी घरे उभारणे. परवडणारी भाडे तत्त्वावरील घरे उभारणे, असा आमच्या सरकारचा अजेंडा आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

पान २ वर



## केंद्राकडून महाराष्ट्राला १०,९३० कोटी; उत्तर प्रदेश, बिहारला अधिक निधी दिल्यावरून टीका

● मुंबई, विशाल कारंडे :

विविध कर रूपाने गोळा होणाऱ्या महसुलातून राज्यांना निधीचे वाटप करताना जानेवारी महिन्यात महाराष्ट्राच्या वाट्याला १० हजार ९३० कोटी आले आहेत. उत्तर प्रदेशला ३१ हजार कोटी तर बिहारला १७ हजार कोटींचे वाटप करण्यात आल्याबद्दल कर्नाटकातील काँग्रेस नेत्यांनी टीका केली आहे.

पान २ वर

## () थोडक्यात ()



### पाचाड येथे राजमाता जिजाऊ माँसाहेबांचा ४२६ वा जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा

रायगड - स्वराज्याची राजधानी किल्ले रायगड परिसर हा पुरातत्त्व खात्याच्या अखत्यारित येत असून त्यांच्या नियमाखाली सर्व प्रशासन काम करीत आहे. रायगड प्राधिकरणाच्या माध्यमातून ज्या पद्धतीने रायगडची विकासात्मक कामे चालू आहेत त्याच धर्तीवर राजमाता जिजाऊ माँसाहेबांचा वाडा हा जुन्या पद्धतीने बांधून त्याचे संवर्धन करण्याचा विचार असल्याचे प्रतिपादन रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकासमंत्री भरत गोगावले यांनी केले. रायगड जिल्हा परिषद आणि पाचाड ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने रा राजमाता जिजाऊ माँसाहेबांच्या ४२६ व्या जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन पाचाड येथील समाधीस्थळी करण्यात आले होते. यावेळी श्री गोगावले यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ माँसाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विधिवत पूजन,अभिषेक व महाआरती करण्यात आली. या प्रसंगी पंचायत समिती महाड गटविकास अधिकारी डॉ. स्मिता पाटील, पाचाड सरपंच सीमा बेंदुगडे,यांसह विविध अधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते. या जन्मोत्सव सोहळ्याला विविध शिवभक्त संघटनेचे सदस्य,शेकडो शिवभक्त आणि पाचाड ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कुर्ल्यातील उपाहार गृहात भीषण आग



मुंबई : कुर्ला पश्चिमेकडील एलबीएस मार्गावरील रंगून ढाबा या हॉटेलमध्ये शनिवारी रात्री सव्वा नऊच्या सुमारास भीषण आग लागली. ही आग इतकी भडकली होती की आगीच्या ज्वाळा दूरूनही दिसत आहेत. उपाहारगृहाच्या खालच्या मजल्यावर ही आग लागली आहे.

अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले असून आग विझवण्याचे काम सुरू आहे. कुर्ला पश्चिमेकडील लालबहादूर शास्त्री मार्गावर कल्पना टॉकीजच्या समोर असलेल्या रंगून जायका ढाबा या हॉटेलमध्ये भीषण आग लागली. रात्री सव्वा नऊच्या सुमारास लागलेली ही आग काही वेळातच भडकली असून आगीची तीव्रता वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एलबीएस मार्गावरून वाहनांची सतत वर्दळ सुरू असते. तसेच या मार्गावर अनेक ढाबे एकमेकांना खेटून आहेत. त्यामुळे घटनेचे गांभीर्य वाढले आहे. घटनास्थळी पालिका विभाग कार्यालयाचे पथक, अग्निशमन दलाचे पथक, चार फायर इंजिन, तीन पाण्याचे ट्रॅंकर, पोलीस, विद्युत वितरण कंपनीचे पथक जमले आहे. आग विझवण्याचे काम रात्री उशीरपर्यंत सुरु होते. आगीत कोणी जखमी आहे किंवा नाही याबाबत अद्याप माहिती उपलब्ध झालेली नाही.

## अमरावतीच्या गोल्डन फायबर कंपनीत विषबाधा



● अमरावती, सचिन कदम :

अमरावतीच्या नांदगाव पेठ MIDC मधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. येथील गोल्डन फायबर कंपनीत १०० पेक्षा अधिकच्या कामगारांना अचानक विषबाधा झाल्याची माहिती पुढे आली आहे. अन्न किंवा पाण्यातून विषबाधा झाल्याची प्राथमिक माहिती आहे. यात अनेक महिलांना उलट्यांचा त्रास होत असल्याचे निदर्शनात आले आहे. घटनेची माहिती मिळताच यातील रुग्णांना जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. मात्र ही विषबाधा नेमकी कशी आणि कशातून झाली हे अद्याप कळू शकलेले नसले तरी त्या दिशेने तपास सुरू आहे. दरम्यान, अशीच एक संतापजनक घटना अमरावतीत घडली आहे. यात बिस्किट पुड्यात चक्क अळया आढळल्याचा प्रकार घडला आहे. नारायण कराडे यांच्या घरी हा प्रकार घडला आहे. नारायण कराडे यांनी दुपारी शहरातील डी मार्ट मॉलमधून अनेक वस्तू खरेदी केल्या होत्या. यासोबतच बिस्कीटांची देखील खरेदी केली होती. मात्र, घरी आल्यानंतर बिस्किट उघडताच त्यातून अळया बाहेर पडल्याचे प्रकार घडला. यामुळं ग्राहकांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या विरुद्ध कारवाईची मागणी आता नारायण कराडे यांनी केली आहे.

पान २ वर

## ठाकरेंना भाजप जवळ करणार नाही - गुलाबराव पाटिल



● नागपूर, नितीन देवळेकर :

भाजप ठाकरेंच्या शिवसेनेला जवळ करणार नसल्याचे सूचक वक्तव्य शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि मंत्री गुलाबराव पाटील यांनी केलं. ठाकरेंची शिवसेना ही भाजपच्या जवळ आली तर आम्हाला काही समस्या नाही.

पान २ वर

### शिवसेना ठाकरे गटाचा स्वबळाचा नारा

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठा फटका बसला. यानंतर महाविकास आघाडीतील धुसफूस समोर येत आहे. नुकताच काँग्रेस नेते नितीन राऊत यांनी महाविकास आघाडीला घरचा आहेर दिला. यानंतर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी काँग्रेस आणि ठाकरे गटाला टोला लगावला. यामुळे आगामी महापालिकेच्या निवडणुकीत महाविकास आघाडी एकत्र लढणार की स्वतंत्र मैदानात उतरणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. त्यातच आता शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि नगर पंचायतीच्या निवडणूक

## अमोल कोल्हे हवेवर निवडून येणारे खासदार - उध्दव ठाकरे



● बीड, दिगंबर जाधव :

ठाकरे गट झोपेतून जागा व्हायला तयार नाही तर काँग्रेसची मोडलेली पाठ सरळ होत नाही, असे वक्तव्य शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी भर सभेत केले होते. यावरून ठाकरे गटाने कोल्हेंना ते हवेवर निवडून येणारे खासदार असल्याचे म्हटले आहे. राज्याची सध्याची परिस्थिती पाहिली तर ठाकरे गट झोपेतून जागा व्हायला तयार नाही. त्यासोबत पराभवानंतर काँग्रेसची मोडलेली पाठ सरळ व्हायला तयार नाही. आपल्याकडे लढणारे शरद पवार आहेत, आता आपल्याला लढायला संधी आहे. सध्या विरोधी पक्षात मोठी जागा शिल्लक आहे. त्यामुळे बचेंगे तो और भी लढेंगे असं विधान त्यांनी पक्षातील आढावा बैठकीत कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांसमोर केले होते. यावर विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी कोल्हे यांच्यावर टीका केली आहे. जाग यावी असे कोण म्हणाले मला माहिती नाही. अमोल कोल्हे हवेवर निवडून येणारे खासदार आहेत. संघटनेत २०-३० वर्षे झिजावे लागते ते त्यांना माहित नाही.

पान २ वर

## पाच वर्षांपासून पाली बसस्थानक नूतनीकरणाच्या प्रतिक्षेत

● पाली, फरीद डावरे



अष्टविनायक तीर्थक्षेत्र व सुधागड तालुक्यातील मुख्यालयाचे ठिकाण असलेल्या पालीतील बसस्थानकाचे नूतनीकरणाचे काम मागील पाच वर्षांपासून रखडले आहे. नवीन इमारतीच्या पुनर्बांधणीस व नूतनीकरणास अजूनही सुरुवात झालेली नाही.

तसेच स्थानकाला खड्डे, जुन्या तोडलेल्या इमारतीचे डेब्रिज, उघडा नाला, दुर्गंधी आदी विविध समस्यांनी वेढले आहे. परिणामी येथील प्रवाशांची प्रचंड गैरसोय होत आहे. बसस्थानकाच्या दुरावस्थेकडे शासन व लोकप्रतिनिधी कोणाचेही लक्ष नाही.

साधारण तीन वर्षांपूर्वी पाली बस स्थानकाची जुनी धोकादायक व इमारत तोडण्यात आली आहे. त्यावेळी स्थानक आवारात तात्पुरत्या स्वरूपाची निवारा शेड व स्वच्छतागृह बांधण्यात आले. निवारा शेड छोटी असल्यामुळे प्रवाशांना बसण्यासाठी अडचण होते. मात्र त्यानंतर आजतागायत परिवहन महामंडळ अथवा कंत्राटदाराकडून तेथे कोणत्याही स्वरूपाचे काम सुरू करण्यात आलेले नाही. जुन्या इमारतीचे डेब्रिज व राडारोडा स्थानकात तसाच पडला आहे. स्थानकातील नाल्याचा एका बाजूचा स्लॅब दुरुस्त करून तेथून अजूनही वाहतूक सुरु झालेली नाही. त्यामुळे बस एका बाजूनेच जातात व येतात त्यामुळे बस ना येजा करण्यास अडथळा येतो. स्थानक आवारात पालीतील नाले व गटारांतील सांडपाणी येते. त्यामुळे येथे खूप दुर्गंधी पसरली आहे.

पान २ वर

■ पाली बस स्थानकाच्या इमारतीचे नूतनीकरण काम मार्गी लागावे यासाठी पाठपुरावा करत आहे. यासंदर्भात लवकरच संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊ उपाय काढू.

**रविंद्र पाटील, आमदार, पेण-सुधागड-रोहा मतदारसंघ**


## बृहतसूचीवरील पात्र भाडेकरूंना सशर्त ताबा, म्हाडा उपाध्यक्षांचा निर्णय

● मुंबई, विशाल पाटील :




म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाच्या बृहतसूची सोडतीतील पात्र भाडेकरूंच्या निकटच्या वारसांना आता सदनिकेचा सशर्त ताबा देण्याचा निर्णय म्हाडा उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांनी घेतला आहे. मृत भाडेकरुंचे एकापेक्षा अधिक वारस असल्यास सक्षम न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र आवश्यक असते. ते प्रमाणपत्र मिळविण्यासाठी सहा ते नऊ महिन्यांचा कालावधी लागतो. त्यामुळे ताबा घेण्यास विलंब होत असल्याने जयस्वाल यांनी सदनिकेचा सशर्त ताबा देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार लाभार्थ्यांनी ताबा मिळाल्यापासून सहा महिन्यात वारस प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य असेल. या निर्णयामुळे वारसांना, लाभार्थ्यांना दिलासा मिळणार आहे. वर्षानुवर्षे संक्रमण शिबिरात राहणाऱ्या संक्रमण शिबिरार्थींना कायमस्वरुपी हक्काची घरे देण्यासाठी बृहतसूची तयार केली जाते. सोडतीद्वारे बृहतसूचीवरील संक्रमण शिबिरार्थींना घरांचे वितरण केले जाते. संक्रमण शिबिरात ३० ते ५० वर्षांपासून उपकरप्राप्त इमारतीतील मूळ भाडेकरु राहतात. अशावेळी अनेक मूळ भाडेकरूंचा मृत्यू झालेला असतो. अशा प्रकरणांमध्ये मृत भाडेकरूंचे पत्नी वा मुले असे एकापेक्षा अधिक वारस असल्यास त्यांना सक्षम न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र बंधनकारक असते. ते घेण्यासाठी सहा ते नऊ महिन्यांचा कालावधी लागतो. परिणामी घराच्या वितरणास विलंब होतो. ही बाब लक्षात घेता सदनिकेचे वितरण वेगाने व्हावे यासाठी आता बृहतसूचीवरील घरांचे सशर्त वितरण वारसांना करण्याचा निर्णय जयस्वाल यांनी घेतला आहे.

बृहतसूचीवरील मूळ भाडेकरूच्या निकटचे वारस (मुलगा, मुलगी, आई-वडील किंवा पत्नी) असल्यास इतर नातेवाईकांचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन सदनिकेचा सशर्त ताबा देता येईल. ताबा पावती निर्गमित केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत सक्षम न्यायालयाचे वारस हक्क प्रमाणपत्र सादर करणे बंधनकार असेल आणि या आशयाचे क्षतीपूर्तीबंध संबंधित वारसदार लाभार्थ्यांकडून घेणे बंधनकारक राहिल असा हा निर्णय आहे.




## एक्वा मरीन ग्लोबल कल्चर कंपनीकडून फसवणूक

● पनवेल, भावना जैन :

मुंबई आणि नवी मुंबईतील नागरिकांना मोठ्या परताव्याचे आमिष दाखवून एक्वा मरीन ग्लोबल कल्चर कंपनीने फसवणूक केल्याचा प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणात अंधेरीतील गुंतवणूकदार मोहम्मद इस्माईल शेख यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. कंपनीने महिन्याला १५ टक्के परताव्याचे आश्वासन देत शेख यांच्याकडून १४ लाख रुपयांची गुंतवणूक घेतली होती. सुरुवातीचे काही महिने परतावा दिल्यानंतर कंपनीने तो थांबवला. तक्रार दाखल झाल्यानंतर खारघर पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास अंधेरी एमआयडीसी पोलिसांकडे वर्ग केला. मुंबई आणि नवी मुंबई पोलिसांनी कंपनीचे मालक विनय कांबळे यांना ताब्यात घेऊन मुंबई पोलिसांच्या स्वाधीन केले.

## संपादकीय

# वाचन ते वाचनसंस्कृती!

'संकल्प महाराष्ट्राचा' याअंतर्गत वाचन उपक्रम एक जानेवारीपासून सुरू झाला असून तो 15 जानेवारीपर्यंत हा उपक्रम राबवला जाणार आहे. ग्रंथ प्रदर्शन, वाचनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना कळण्यासाठी व्याख्यान, विद्यार्थ्यांचा लेखकाशी संवाद, सामूहिक वाचन उपक्रम, पुस्तक परिचय-परीक्षण स्पर्धा, वाचन कौशल्य कार्यशाळा, ग्रंथकथन अशा विविध उपक्रमांचे आयोजन केले जात आहे.

मोबाईल आणि समाजमाध्यमांमध्ये अडकलेल्या विद्यार्थ्यांना पुस्तकाकडे वळवण्यासाठी एक-दोन दिवसाचे नव्हे तर संपूर्ण पंधरवड्याचे नियोजन करण्यात आले आहे. ज्यांनी अजून अभ्यासक्रमबाह्य वाचनाच्या क्षेत्रात पहिले पाऊलही टाकलेले नाही, त्यांना पुस्तक वाचनाचा आनंद काय असतो, पुस्तक वाचन म्हणजे नेमके काय, हे कळण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे. या उपक्रमाचे अंतिम उद्दिष्ट हे वाचनसंस्कृती निर्माण व्हावी, वाढावी हा आहे. यामध्ये विशेष म्हणजे राज्यातील सर्व शासकीय ग्रंथालयांचाही सहभाग असणार आहे. या उपक्रमामध्ये अनेक विद्यार्थी प्रथमच अवांतर वाचन कौशल्याकडे जाणार आहेत. काही विद्यार्थ्यांकडे हे कौशल्य पूर्वीपासूनच असणार आहे. बरेचसे विद्यार्थी केवळ ऑनलाईन येणारे बरेचसे टुकार साहित्य वाचणारे असणार आहेत. या सर्वांना एकत्र आणण्याचे, काहीजणांसाठी अनिच्छेने असले, तरीही या उपक्रमात सहभागी होण्याचे कार्य या उपक्रमातून साध्य होणार आहे. वाचनाचे महत्त्व सांगणारी व्याख्याने काही विद्यार्थ्यांवर निश्चितच वाचन संस्कार करणार आहेत. म्हणूनच मोबाईल युगात हा अभिनव उपक्रम महत्त्वाचा ठरतो. मनापासून वाचणारी मंडळी निश्चितच वाचन संस्कृतीपर्यंत पोहोचणार यात शंका नाही. वेळ किती लागणार हे त्या वाचकाच्या वाचन गतीवर आणि शास्त्रशुद्धतेवर अवलंबून असणार आहे. वाचन मूलत: मानवाला ज्ञानसंपन्न बनवते. ज्ञानसंपन्न व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व आपोआपच चारचौघांत उठून दिसते. नव्याने वाचनप्रवाहात येणाऱ्या वाचकांनी हे लक्षात घेण्याची गरज आहे की, वाचन ते व्यक्तिमत्त्व विकास व्हाया वाचनसंस्कृती या प्रवासातील वाचन हा पहिला टप्पा आहे.

या प्रवाहात येऊ इच्छिणाऱ्यांचा काय वाचावे, असा प्रश्न असतो, वाचणार कधी? आपल्याकडे वाचनासाठी बिलकूल वेळ नाही, असे अनेकांचे मत असते. वेळ नाही ही तक्रार अत्यंत चुकीची आहे. सर्वांकडे केवळ दिवसाचे २४ तासच असतात. या २४ तासांत आपण काय करतो, याचा हिशेब आपणच मांडायला हवा. दिवसभर आपण किती वेळ वाया घालवतो, हे आपोआपच लक्षात येते. त्याचप्रमाणे आपली कोणाशी तरी बैठक ठरलेली असते. आपण वेळेवर जातो, मात्र समोरची व्यक्ती वेळेवर येत नाही. हा प्रतीक्षा कालावधी तर खूप त्रास देणारा असतो. मात्र अशा वेळी जर आपल्याबरोबर एखादे पुस्तक असेल तर आपला वेळ निश्चितच चांगला जातो. आपली चिडचिड होत नाही. त्यामुळे वेळ नाही ही सबब योग्य नाही. मात्र वाचनाची सुरुवात करताना आपल्या आवडीच्या विषयाच्या हलक्या पुस्तकांनी करावी. पुढे आपले वाचन जसे समृद्ध होत जाते, तसे आपले हात इतर विषयांकडे या विषयातील अभिजात पुस्तकांकडे आपोआप जायला सुरुवात होते.

वाचन करायचे तर पुस्तक वाचायचे. मात्र कोणते पुस्तक वाचावे, असा प्रश्न अनेक वाचक विचारतात. काय वाचावे, असाही काहींचा प्रश्न असतो. खरे सांगायचे तर जे मिळेल ते वाचावे. त्यातून आपण वाचनासाठी पुस्तक निवडताना पुस्तकाची प्रस्तावना आणि ब्लर्ब किंवा पाठराखण वाचून ठरवता येते. पुस्तकाचे वाचन करताना आपण त्या भूमिकेत शिरून पुस्तक वाचायला हवे. पुस्तकाचे वाचन मन एकाग्र करून वाचन करण्याची गरज असते. आपण वाचन केलेले पुस्तकातील विचार आपल्या मेंदूपर्यंत पोहोचले पाहिजेत. पुस्तकातील चांगले विचार, अनुभव हे आपण निवडायला हवेत. मेंदू हा आपल्यासाठी वरदान आहे. याचा वापर करूनच आपण इतर प्राण्यांपेक्षा वेगळे ठरलो आहोत. आपल्याला संगणकाची, मोबाईलची मेमरी किती आहे, हे माहीत असते. मात्र आपल्याच मेंदूची मेमरी किती आहे, हे अनेकांना माहीत नसते. मानवी मेंदू साधारण १३०० ते १४०० ग्रॅम वजनाचा असतो. त्याची स्मृती क्षमता किंवा साठवण क्षमता २५ लक्ष गिगाबाईट इतकी आहे. आजमितीला कोणाकडेही एवढी मेमरी असणारा संगणक किंवा मोबाईल असणे शक्य नाही. असे असतानाही आपण त्याचा वापर अत्यल्प करतो. आपण जर त्याचा वापर कमी करत गेलो, तर डार्विनच्या सिद्धांतानुसार भविष्यात मानवी मेंदू आकाराने घटत जाईल. त्यामुळे त्याचा वापर आपण जास्तीत जास्त केला पाहिजे.

## आजची चित्रोळी



जर असे लगडले टोमॅटो तर
शेतकऱ्यांचे भाग्यच बदलेल !
सुजलाम सुफलाम भारत होऊन
जगांत साऱ्या लौकिक वाढेल !!

**मुकुंद कुलकर्णी, मुंबई**

# तिळगुळ घ्या... गोड गोड बोला.....!!



भारतीय संस्कृतीत सणांना अतिशय महत्व आहे. प्रत्येक सण विशिष्ट असा संदेश देत असतो. या सणातून एक वेगळीच प्रेरणा मिळत असते. मकर संक्रात हा त्यापैकीच एक सण. मकर संक्रात हा वर्षातील पहिला सण त्यामुळे या सणाचा उत्साह काही निराळाच असतो. मकर संक्रांत हा सण संपूर्ण देशात वेगवेगळ्या नावाने आणि वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. आपल्या महाराष्ट्रात तर या सणाला खूप महत्व दिले जाते. मकर संक्राती म्हणजे सूर्याने मकर राशीत प्रवेश करणे. सूर्य ज्या दिवशी दक्षीयणातून उत्तरायणात मार्गक्रमण करतो त्या तिथीला मकर संक्रांत साजरी केली जाते. ही तिथी कधी १४ जानेवारीला येते तर कधी १५ जानेवारीला येते. यावर्षी ही तिथी १४ जानेवारीला आली आहे. संक्रात ऐन थंडीत येते त्यामुळे हवेत गारवा असतो त्याचा परिणाम आपल्या प्रकृतीवर होतो. त्यामुळे या दिवसात शरीराला उष्ण ठेवण्यासाठी उष्ण पदार्थ खाल्ले जातात. तीळ आणि गूळ यात उष्मांक अधिक प्रमाणात असतो. कदाचित त्यामुळेच मकर संक्रांतीच्या दिवशी तिळगुळ वाटला जातो. संक्रातीच्या दिवशी तीळ आणि गूळ यांच्या वड्या किंवा लाडू एकमेकांना देण्याची पद्धत आहे. तिळगुळ देताना तिळगुळ घ्या गोड गोड बोला असा संदेशही दिला जातो. एकमेकांविषयी स्निग्धता देणारे तीळ आणि गोडवा देणारा गूळ एकत्र आल्याने प्रेमाचे नाते टिकते असे प्रतिकात्मक रूपही या सणाला आहे. एकमेकांशी असलेली कटुता भांडण विसरून एकत्र येण्याचा संदेश देणारा हा सण आहे. मकर संक्रातील विवाहित स्त्रिया एकमेकांना हळदी कुंकू लावून सौभाग्याचे वान देतात. हे सर्व करण्यामागे कोणतीही रूढी परंपरा नसून नव्याने स्वागत आणि त्यातून आनंद घेणे हा आहे. पूर्वी स्त्रियांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळत असे या सणानिमित्त महिला एकत्र येत असे. आजच्या धकाधकीच्या जीवनातही महिलांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळते त्यामुळे संक्रातीनिमित्त मिळणारी ही आयती संधी महिलावर्ग सोडत नाहीत. मकर संक्रांत हा सण महिलांचा सण असे मानले जात असले तरी लहान मुलेही या सणाची आतुरतेनं वाट पाहत असतात. मकर संक्रांतीच्या दिवशी पतंग उडवण्याची परंपरा आहे. अनेक गावात पतंगोत्सव आयोजित केला जातो. या दिवशी आकाशात विविध रंगांची, आकाराची पतंगे उडताना दिसतात. पतंगाचे विविध आकार रंग पाहून मन प्रसन्न होते. एकमेकांशी असलेली कटुता विसरून प्रेमाने वागा असा संदेश देणारी मकर संक्रात म्हणजे आनंदाची पर्वणीच. मकर संक्रांतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा! तिळगुळ घ्या गोड गोड बोला!!

**श्याम ठाणेदार, पुणे**



## नाशिकमध्ये एक लाखाचा नायलॉन मांजा जप्त

**नाशिक (सचिन कदम):** शहरात एकाच दिवसात एक लाख नऊ हजार रुपयांचा नायलॉन मांजा जप्त करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखा विभाग एकच्या वतीने ही कामगिरी करण्यात आली. गुन्हे शाखा एकचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी आणि कर्मचारी यांची पथके तयार करण्यात आली असून नायलॉन मांजा विक्रेत्यांवर कारवाई करण्याच्या सूचना पथकांना देण्यात आल्या आहेत. अंबड पोलीस ठाणे हद्दीत पवननगर येथील गणपती मंदिराजवळ संतोष चव्हाण याच्या ताब्यातून ५५ हजार रुपयांचा तर, पंचवटी पोलीस ठाणे हद्दीत पेठरोड येथून आतिश बोडके (२५, रा. फुलेनगर) याच्या ताब्यातून ४४ हजार रुपयांचा मांजा जप्त करण्यात आला. तिसऱ्या कारवाईत वडाळा येथील गरीब नवाज कॉलनी परिसरातून शेख मोहसीन (१९, रा. वडाळा) याच्याकडून १० हजार रुपयांचा मांजा जप्त करण्यात आला.

## ठाणे महानगरपालिका शिक्षण विभाग आयोजित सांस्कृतिक महोत्सव संपन्न



**ठाणे (रोहित जैसवार) :** ठाणे महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये उत्तम कलागुण असून त्यांना बाल रंगकर्मी योजनेत प्रशिक्षण देऊन या विद्यार्थ्यांचे एखादे बालनाट्य बसवून महाराष्ट्राभर त्याचे २५ प्रयोग व्हावेत, असे प्रतिपादन अभिनेते आणि निर्माते मंगेश देसाई यांनी ठाणे महानगरपालिका शाळांचा सांस्कृतिक महोत्सवाच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमात केले. ठाणे महानगरपालिका शाळांचा मध्यवर्ती सांस्कृतिक महोत्सव काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे नुकताच संपन्न झाला. सांस्कृतिक महोत्सव २०२४-२५ मध्ये नृत्य आणि नाट्य विभाग अशा दोन प्रकारांमध्ये स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. नृत्यविभागात इयत्ता १ ली ते ५वीच्या एकूण २४, इयत्ता ६ वी ते ८ वीच्या ६१ शाळांनी, तर नाट्य विभागांमध्ये १९ अशा एकूण १०४ शाळांनी भाग घेतला होता. त्यामधून बक्षीसपात्र विद्यार्थी व शाळांना मंगेश देसाई, बालकलाकार मायरा वायकूळ, उपायुक्त (शिक्षण) सचिन सांगळे यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात बक्षीसपात्र १३ नृत्ये आणि २ नाटके असे १५ कार्यक्रम विद्यार्थ्यांनी सादर केले

प्रारंभी ठाणे मनपा शाळा क्र. १३. खोपटच्या विद्यार्थिनींनी ईशस्तवन व स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात ठाणे महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे यांनी विद्यार्थी बालकलाकारांचे आणि मार्गदर्शक शिक्षकाचे कौतुक केले. तसेच, बालकलाकार मायरा हिने सर्वांना शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी, गटाधिकारी संगीता बामणे, प्राथमिक शिक्षक संघटनेचे पदाधिकारी बाबाजी फापाळे, जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी ठाणे व पालघरचे संचालक जगन्नाथ जाधव आदी उपस्थित होते. सांस्कृतिक समिती २०२४-२५च्या कार्याध्यक्षा अनघा पालांडे पानी उपस्थिताचे आभार मानले.

## पान १ वरून...

### केंद्राकडून महाराष्ट्राला १०,९३० कोटी; उत्तर...

वस्तू आणि सेवा कर तसेच विविध कर रूपाने गोळा होणाऱ्या महसुलातून राज्यांना १५व्या वित्त आयोगाच्या शिफारसीवरून ४१ टक्के रक्कम दिली जाते. ४१ टक्के रक्कम देण्याची तरतूद असली तरी प्रत्यक्षात ३३ टक्केच रक्कम मिळते, असा आरोप तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनि मागे केला होता.

जानेवारी महिन्यासाठी केंद्र सरकारने राज्यांना १ लाख ७३ हजार कोटींची रक्कम हस्तांतरित केली आहे. डिसेंबरमध्ये ८९ हजार कोटी रक्कम देण्यात आली होती. विविध विकास प्रकल्प राबविण्यासाठी केंद्राने यंदा राज्यांना देण्यात येणाऱ्या रक्कमेत वाढ केल्याची माहिती केंद्र सरकारच्या प्रवक्त्याने दिली.

यंदा महाराष्ट्राच्या वाट्याला १०,९३० कोटी रुपये आले आहेत. याआधी ऑक्टोबर महिन्याता राज्याच्या वाट्याला ११ हजार २५५ कोटी रुपये आले होते. २०२३-२४ या आर्थिक वर्षात केंद्राकडून राज्याला कर महसुलातून ६९,७७० कोटी रुपये मिळाले होते. चालू आर्थिक वर्षात या रक्कमेत वाढ होण्याची चिन्हे आहेत.

जानेवारी महिन्यासाठी केंद्राने निधीचे वाटप करताना उत्तर प्रदेशला सर्वाधिक ३१ हजार कोटी दिले आहेत.

बिहार (१७,४०३ कोटी), मध्य प्रदेश (१३,५८२ कोटी), पश्चिम बंगाल (१३ हजार कोटी) या चार राज्यांना अधिक निधी देण्यात आला आहे. उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेशला अधिक निधी देताना नेहमीप्रमाणे कर्नाटकवर अन्याय करण्यात आल्याचा आरोप काँग्रेसचे माजी खासदार डी. के. सुरेश यांनी केला आहे. कर्नाटकच्या वाट्याला ६३१० कोटी रुपये आले आहेत. कर रुपाने जमा होणाऱ्या महसुलातून राज्यांना निधी देण्याचे सूत्र निश्चित करण्यात आले आहे. यानुसाच निधीचे वाटप केले जाते, असे वित्त विभागाने स्पष्टीकरण दिले आहे.

### अमरावतीच्या गोल्डन फायबर कंपनीत विषबाधा

अन्न व औषधी प्रशासन या गंभीर विषयाची दखल घेणार का?

बिस्किटात अळया निघाल्याने नारायण कराडे आक्रमक झाले आहेत. त्यांनी या प्रकरणी कारवाई करण्याची मागमी देखील केली आहे. त्यामुळं आता त्यांच्या या मागणीवर अन्न व औषधी प्रशासन या गंभीर विषयाची दखल घेणार का याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

**अनेकवेळा शालेय पोषण आहारातही अळया निघाल्याचा प्रकार**

शालेय विद्यार्थ्यांना शाळेसोबत शिक्षणाची गोडी लागावी यासाठी शालेय पोषण आहार योजना सुरु करण्यात आली आहे. मात्र या योजनेसाठी पुरवठा केला जाणार आहारातील माल निकृष्ठ दर्जाचा पुरवठा होत असल्याच्या घटना देखील समोर आल्या आहेत. शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ खेळला जात असल्याचा सवाल उपस्थित केला गेला आहे. शाळेत शालेय पोषण आहारासाठी या अगोदर अळया, किडे, पाल पडल्याने विषबाधा झाल्याचे अनेक प्रकार समोर आले आहे. अशा प्रकरणाची सखोल चौकशी करावी अशी मागणी देखील होत आहे. शाळेत निकृष्ट दर्जाचं शालेय पोषण आहार देणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, आता मॉलमध्ये मिळणाऱ्या मालात देखील अळया निघाल्याचा प्रकार समोर आल्यानं संताप व्यक्त केला जात आहे.

### ठाकरेंना भाजप जवळ करणार नाही...

ज्या काळात भाजपला मदतीची गरज होती, त्या काळात त्यांचे विचार सोडून ते गेले. तेव्हा भाजपला मदत करण्यासाठी आम्ही उठाव केला आहे. त्यामुळं भाजप निश्चितच आमचा विचार करेल असंही पाटील म्हणाले.

जो पडतीच्या काळात आपल्यासोबत असतो तोच आपला खरा भाऊ असतो असेही गुलाबराव पाटील म्हणाले. महायुतीचे २३७ आमदार निवडून आले आहेत. २० आमदार त्यांचे आहेत. संजय राऊत यांचा कार्यक्रम संपला असल्याचे गुलाबराव पाटील म्हणाले. त्यामुळं ते भाजपशी जवळीक साधत असले तरी मला असं वाटतं की भाजप ठाकरेंच्या सेनेला जवळ करणार नाही असंही गुलाबराव पाटील म्हणाले.

**कार्यकर्त्यांना संधी न दिल्यामुळे पक्ष वाढीला फटका बसतो**

नागपूरपासून मुंबईपर्यंत आम्ही स्वबळावर लढणार आहे. एकदा आम्हाला पाहायचे आहेच, जे काही होईल ते होईल, आमचं असं ठरतंय. मुंबई, ठाणे नागपूरमध्ये कार्यकर्त्यांना संधी केव्हा देणार? कार्यकर्त्यांना संधी न दिल्यामुळे पक्ष वाढीला फटका बसतो. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका सर्व पक्षांनी स्वबळावर लढवाव्या आणि आपापल्या कार्यकर्त्यांना संधी द्यावी, अशी घोषणा त्यांनी केली आहे. संजय राऊत यांच्या घोषणेनंतर आता महाविकास आघाडीतील मित्रपक्ष नेमकी काय भूमिका घेणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे

### अमोल कोल्हे हवेवर निवडून येणारे खासदार...

त्यांनी त्याचे मत व्यक्त केले आहे. एखादा पराभव आणि विजय एकाचा नाण्याच्या दोन बाजू आहेत. आघाडीत बिघाडी कुठेही नाही. निवडणूक आली की विजय पराजय होतो, माविआ फुटत नाही. संजय राऊत यांनी स्थानिक स्वराज्य संस्था स्वबळावर लढण्याचे संकेत दिले आहेत असे दानवे म्हणाले.

वेगवेगळ्या कामानिमित्त राज्याच्या मुख्यमंत्र्यांना भेटावे लागते. जनतेच्या प्रश्नासाठी आदित्य ठाकरेंनी भेट घेतली यात काही वावगे नाही, असेही दानवे यांनी स्पष्ट केले. शिवसेनेत अनेक जण आले आणि गेले शिवसेना तळपत राहिली आहे. त्यामुळे कोणी आले गेले यांने फरक पडत नाही. एकटे मुख्यमंत्री सांभाळू शकत नाही, त्यांना जनतेची साथ लागते अशी शरद पवार यांची भूमिका असेल तर ती सगळ्यांची भूमिका असेल, असेही दानवे यांनी स्पष्ट केले.

विरोधक दिसत नाहीत असे नाही. बीड प्रकरणात सगळ्यात आधी विरोधकांनी भूमिका मांडली. विरोधीपक्ष सगळ्या प्रश्नावर बोलत आहेत. बीड प्रकरणात सरकार गुन्हेगारांना संरक्षण देत असल्याचा आमचा आरोप आहे. वाल्मिक कराड याचा या प्रकरणात प्रत्यक्ष सहभाग आहे. त्याला पाठीशी घातले जात आहे, अशी टीका दानवे यांनी केली.

### पाच वर्षांपासून पाली बसस्थानक...

स्थानकात मोठाले खड्डे पडले आहेत. प्रवाश्यांना पिण्यासाठी चांगले पाणी देखील नाही. अशा प्रकारे पाली बसस्थानकाची दुरवस्था झाली आहे. यामुळे स्थानिक नागरिक व प्रवाश्यांमध्ये प्रचंड संताप आहे.

स्थानकाच्या बाजूने नाला जातो त्यामुळे स्थानकामध्ये नाल्याचे पाणी साठते. त्यामुळे स्थानकाची इमारत उंच करणे अपेक्षित आहे. जुन्या प्रशासकीय मान्यतेत व टेंडर मध्ये या सर्व गोष्टी नमूद नव्हत्या. त्यामुळे या सर्व गोष्टी नमूद करून सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी मध्यवर्ती कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवला आहे. नूतनिकरणास अंदाजे १२ कोटी खर्च अपेक्षित आहे. प्रशासकीय मान्यता मिळाल्यावर लागलीच टेंडर काढले जाईल आणि पुढील प्रक्रिया वेगाने होतील.

**मीनल मोरे, कार्यकारी अभियंता राज्य परिवहन महामंडळ मुंबई प्रदेश**

स्थानकाचे नूतनीकरण व येथील समस्या मार्गी लावण्यासाठी अनेकदा उपोषण केले आहे. याबाबत सातत्याने वरिष्ठ स्तरावरून अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन व निवेदन देऊन पाठपुरावा करत आहे. मात्र अद्यापही कोणतीही उपाययोजना व ठोस कारवाई झाली नाही. त्यामुळे या प्रश्नांवर पुन्हा उपोषणाला बसणार आहे.

**रवींद्रनाथ ओव्हाळ, सामाजिक कार्यकर्ते, पाली**

**स्थानकाची विटही बसवली नाही**

नवीन बस स्थानक नुतनीकरणासाठी तब्बल २ कोटी ३६ लाखांचा निधी नोव्हेंबर-डिसेंबर २०१९ मध्ये मंजूर झाला होता. तसेच इमारतीच्या प्रत्यक्ष बांधकामास जानेवारी २०२० पासून सुरुवात होणार होती. मात्र यावेळी काही अडचणी आल्याने ठेकेदाराने काम बंद केले. या ठेकेदाराला काळया यादीत देखील टाकण्यात आले. मात्र आजतगायत नवीन इमारतीची अजून एक वीट सुद्धा बसविण्यात आलेली नाही.

**वाढीव निधी अपेक्षित**

नवीन प्रस्ताव व आत्ताच्या बाजार भावाप्रमाणे हा निधी वाढण्याची शक्यता आहे. साधारण १२ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. यामध्ये नवीन सुसज्ज भव्य इमारतीसह विविध सुविधा आदींचा समावेश आहे.

**आणखी उशीर**

नवीन प्रस्तावास मान्यता मिळणे त्यानंतर निविदा काढणे नवीन ठेकेदार नेमणे या सर्व प्रक्रियेला आणखी उशीर होईल. आणि ही प्रक्रिया पूर्ण झाल्यावर प्रत्यक्षात स्थानक पुनर्बांधणी काम पूर्ण होण्यास अधिक कालावधी जाण्याची शक्यता आहे.

**दुर्गंधी आणि गैरसोय**

स्थानकाला संरक्षक भिंत नाही. जुन्या इमारतीचा राडारोडा तिथेच बस स्थानकात खड्डे पडले आहेत. बस स्थानकाच्या आवारात पालीतील सांडपाणी येते. व हे दूषित पाणी साचून दुर्गंधी व घाण पसरली आहे. स्थानकाच्या बाजूने प्रचंड झाडाझुडपे वाढले आहेत. तसेच पाली बस स्थानक हे खाजगी वाहनांचे पार्किंगचे ठिकाण बनले आहे. शिवाय निवारा शेड अपूर्ण पडत आहे.

### "सर्वसामान्यांसाठी राज्यात परवडणारे घरी...

परदेशातील वाहनांच्या पूर्णनिर्मितीचे काम आपल्या इथे सुरू होईल आणि यामुळे नागरीकांना नोकऱ्या आणि रोजगार उपलब्ध होईल. त्यामुळे ठाणे खऱ्या अर्थाने बदलत आहे. तसेच मेट्रो प्रकल्पामुळे शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे, असेही ते म्हणाले. आमच्या सरकारने विकासाभिमुख काम केले असून विकास हाच आमच्या सरकारचा आजवर अजेंडा राहिला आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

सर्वकाही पैशांनी विकत घेता येते. पण, विश्वास आणि इमानदारी पैशांनी विकत घेता येत नाही. हेच काम रेमंड समूहाने केले आहे. कापड व्यवसायात असलेल्या या समूहाने संपूर्ण देशाला एका कपड्याच्या धाग्यात विश्वासाच्या नात्याने बांधले आहे. हा समूह प्रत्येक क्षेत्रात कार्यरत आहे. शैक्षणिक क्षेत्रात हा समूह कार्यरत असून ५० हजार हून अधिक मुलांना शिक्षण देण्याच्या काम करत आहे. या समूहाने शासनाच्या शाळा दत्तक घेऊन तेथील शिक्षणाच्या दर्जा वाढवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, असे आवाहन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उद्योगपती गौतम सिंघानिया यांना केले.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या हाती पुन्हा रिक्षाचे स्टेरिंग, शिंदे यांनी दिला जुन्या आठवणींना पुन्हा उजाळा



**ठाणे (रोहित जैसवार) :** 'रेमंड कंपनी आणि सुपर क्लब आयोजित 'ऑटोफेस्ट-२०२५' या ऑटो कार फेस्टिव्हलचे उद्घाटन केल्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पोर्ट्स बाईकपाठोपाठ रिक्षा चालवण्याचा आनंद लुटला. यानिमित्ताने सुरुवातीच्या काळात उदरनिर्वाहसाठी रिक्षा चालविण्याचे काम करणाऱ्या शिंदे यांच्या हातात रिक्षाचे स्टेरिंग दिसून आले. तसेच रिक्षा चालविण्याचा आंनद लुटत त्यांनी जुन्या आठवणींना पुन्हा उजाळा दिला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा जन्म ४ फेब्रुवारी १९६४ रोजी साताऱ्यातील महाबळेश्वर तालुक्यातील दरे या ठिकाणी झाला. शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या एकनाथ शिंदे यांची परिस्थिती तशी बेताचीच होती. त्यामुळे त्यांनी लहान वयातच गाव सोडत ठाणे गाठले. येथेच ते स्थायिक झाले. त्यांनी मंगला हायस्कूलमधून शालेय शिक्षण पूर्ण केले. यानंतर त्यांनी न्यू इंग्लिश हायस्कूलमधून अकरावीचे शिक्षण घेतले. पण आर्थिक अडचणींमुळे त्यांना कॉलेज सोडावे लागले. त्यांनी ठाण्यातील एका मासळी विकणाऱ्या कंपनीत नोकरी करण्यास सुरुवात केली. तिथे ते सुपरव्हायझर म्हणून काम करीत होते. परंतु ही नोकरीसुद्धा सोडत त्यांनी ठाण्यात रिक्षा चालवण्यास सुरुवात केली. पण हे काम करत असतानाच शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेनेचे नेते आनंद दिघे यांच्या विचाराने प्रभावित होऊन पक्षाचे काम करीत होते. पुढे नगरसेवक, आमदार, मंत्री, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री झाले.

आजही राज्याचे मंत्री म्हणून कार्यरत असले तरी ज्या व्यवसायातून करियरची सुरुवात केली, त्या विषयी त्यांच्या मनात आजही आपुलकी दिसून येते. त्यांनी रिक्षाचालकांसाठी विविध योजना आणल्या आहेत. तसेच रिक्षाचालकाचे काम केल्याचे ते सातत्याने अभिमानाने सांगतात. त्यांची रिक्षाविषयीची आपुलकी पुन्हा एकदा दिसून आली आणि यातूनच ऑटोफेस्टमध्ये रिक्षा चालविली. रविवारी 'रेमंड कंपनी आणि सुपर क्लब आयोजित 'ऑटोफेस्ट-२०२५' या ऑटो कार फेस्टिव्हलचे उद्घाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते रविवारी झाले. यावेळी त्यांनी स्पोर्ट्स बाईक आणि रिक्षा चालवण्याचा आनंद लुटला. रिक्षाचे स्टेरिंग शिंदे यांच्या हातात होते तर, या रिक्षात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि उद्योगपती गौतम सिंघानिया हे बसले होते. यानिमित्ताने त्यांनी जुन्या आठवणींना पुन्हा उजाळा दिला.



## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेमध्ये जिजाऊ माँ साहेब आणि स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**भिवंडी (गणेश बागडे)** - सामान्य प्रशासन विभागाचे दि. २७.१२.२०२४ च्या परिपत्रकान्वये आणि महानगरपालिकेचे मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अजय वैद्य यांचे निर्देशानुसार आज दिनांक १२.०१.२०२५ रोजी जिजाऊ मॉ साहेब आणि स्वामी विवेकानंद जयंती निमित्त महानगरपालिका मुख्यालयात तळ मजल्यावर मा. अतिरीक्त शहर अभियंता श्री. सचिन नाईक यांचे हस्ते जिजाऊ मॉ साहेब आणि स्वामी विवेकानंद यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी मा. सहायक आयुक्त श्री. मिलींद पळसुले (समाजकल्याण), श्री. फैसल तातली (आरोग्य), नियंत्रण अधिकारी पर्यावरण विभाग श्री. सुदाम जाधव, श्री. राजेश पवार मुख्य अग्निशमन अधिकारी, श्री. जे. एम. सोनावणे (आरोग्य विभाग प्रमुख), श्री. हरीष भंडारी (आरोग्य विभाग प्रमुख), श्री. संतोष टावरे आणि महानगरपालिकेचे कर्मचारी उपस्थीत होते.

## जिल्हा परिषदेत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांना अभिवादन



**ठाणे (सम्यक कासारे) :-** राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त आज, जिल्हा परिषदेत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी ग्रामपंचायत विभागातील वरिष्ठ सहाय्यक प्रमोद पाटील, कनिष्ठ सहाय्यक सविता गायवळ तसेच विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## शेलारी येथे धर्म महोत्सवाची यशस्वी सांगता!







**मुरबाड (आकाश कांबळे)** - मुरबाड तालुक्यातील एक अवलिया संत पुरुष वै.श्रीराम गजानन जोशी यांच्या पुण्यतिथी निमित्त शेलारी येथे भव्य धर्म महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते

या धर्म महोत्सवात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध प्रबोधनकारहरिभक्त परायण वाणी भूषण राजाराम महाराज घावत यांची प्रवचने तर आचार्य महामंडलेश्वर, धर्मगुरू, महंत अमृताश्रम स्वामी महाराज जोशी, विक्रांत महाराज पोंडेकर, उत्तम महाराज गाडे मुक्ताई ज्ञानपीठ पुणतांबा गोसेवक ज्ञानेश्वर माऊली कदम छोटे माऊली यांची कीर्तने आयोजित करण्यात आली होती यां महोत्सवाचे उद्घाटन आचार्य डॉ. रामकृष्णदास महाराज यांच्या शुभहस्ते झाले याप्रसंगी श्री स्वामी धनंजय महाराज तुंगेश्वर ,योगी गोपीनाथ महाराज संगमेश्वर,योगी यशनाथ महाराज योगी अर्जुन नाथ महाराज टाकेश्वर यांची प्रमुख उपस्थिती होती मुरबाड तालुक्यातील नामवंत मृदंगाचार्य सुधीर कराले, नितीन चौधरी तर गायनाचार्य पवन शिंदे ,त्र्यंबक देवकर, गोविंद पवार उल्हास पागर यांच्यासोबत वारकरी संप्रदायातील अनेक महनीऊ मान्यवर यांचे मार्गदर्शन या सोहळयात झाले

वेदमूर्ती श्रीराम जोशी यांनी सुरू केलेल्या वैदिक अधिष्ठान पद्धतीनं या नाम सोहळयाचे सुरुवात झाली कमालीची शिस्त, सुंदर रंग रांगोळ्या व पुष्प सजावट उत्कृष्ट नियोजन , हजारो भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग विविध अंगी नाविन्यपूर्ण समाज उपयोगी उपक्रम ,नामस्मरण भजन, नेत्राचे पारणे फिटेल असा भव्य दीपोत्सव, उत्कृष्ट अध्यात्मिक प्रबोधन ह्या सर्व वैशिष्ट्यांमुळे हा. अनोखा धर्म महोत्सव म्हणून गणला जातो. काल्याच्या कीर्तनाने या महोत्सवाची सांगता झाली.ग्रामस्थ शेलारी,दहिगाव व परिसर यांनी या धर्म महोत्सवाचे आयोजन केले होते.

# ठाण्यात मदत यंत्रणेच्या सतर्कतेमुळे टळली मोठी दुर्घटना

## इमारतीमधील लॉन्ड्री दुकानात आग लागल्याने सर्वत्र पसरला होता धूर



**ठाणे (विशाल पाटील) :** येथील श्रीनगर भागातील गंगा विहार या तळ अधिक चार मजली इमारतीच्या तळ मजल्यावरील नित्यानंद लॉन्ड्री दुकानात रविवारी पहाटे आग लागली. आगीमुळे इमारतीमध्ये धूर पसरल्याने सुरक्षेच्या दृष्टीने इमारतीमधील २५० रहिवाश्यांना अग्निशमन दलाचे जवान आणि आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यानी सुखरूप बाहेर काढले. तसेच तासाभरात ही आग पूर्णपणे शमविली. मदत यंत्रणेच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली आहे.

ठाणे येथील श्रीनगर भागात गंगा विहार ही तळ अधिक चार मजली इमारती आहे. या इमारतीच्या तळमजल्यावर नित्यानंद लॉन्ड्री नावाचे दुकान आहे. या दुकानात रविवारी पहाटे ५ वाजता आग लागली. ही माहिती दुकान मालक बहादुर बेनी यांनी देताच वागळे इस्टेट विभाग अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाने घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य सुरू केले. आगीमुळे इमारतीत सर्वत्र धूर पसरला होता.

गंगा विहार या चार मजली इमारतीच्या प्रत्येक मजल्यावर १२ सदनिका आहेत. तसेच संपूर्ण इमारतीत एकूण ४८ सदनिका आहेत. त्यामध्ये अंदाजे २५० रहिवासी राहतात. पहाटेची वेळ असल्याने नागरिक घरात झोपलेले होते. आग लागून इमारतीमध्ये सर्वत्र धूर पसरल्याने सुरक्षेच्या दृष्टीने इमारतीमधील २५० रहिवाश्यांना अग्निशमन दलाचे जवान आणि आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यानी सुखरूप बाहेर काढले. आगीत नित्यानंद लॉन्ड्री मधील इस्त्री, लाकडी कपाट, कपडे, विद्युत वायरिंग इतर साहित्य जळून नुकसान झाले आहे. तसेच या गाळयामध्ये असलेले तीन व्यवसायिक सिलेंडर सुरक्षेतेच्या कारणास्तव अग्निशमन दलाने ताब्यामध्ये घेतले आहेत. आग अग्निशमन दलाच्या जवानांकडून व आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यांकडून ६ वाजताच्या सुमारास पूर्णपणे विझविण्यात आली असून, परिस्थिती नियंत्रणात आहे.



## गणेश विद्या मंदिर येथे शिक्षकांसाठी एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

**कल्याण (आकाश कांबळे) :** कोटक एज्युकेशन फाउंडेशन मुंबई यांच्या मार्फत कल्याण पूर्वेतील नागरिक सेवा मंडळ संचलित गणेश विद्यामंदिर या शाळेत शनिवारी पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक या तीनही विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी एकदिवसीय सर्व समावेशक कार्यशाळा मोठ्या उत्साहात पार पडली.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच सर्व शिक्षकांचे व्यक्तिमत्व विकास साधणे, तसेच शालेय कामकाज सुरळीत व योग्य दिशेने चालावे यासाठी टीम वर्क कसे असावे व त्याचे परिणाम याचे प्रात्यक्षिक व उपक्रमांद्वारे महत्त्व पटवून देण्यात आले. विद्यार्थ्यांना शिकवताना येणाऱ्या अडचणी आणि त्यावरील उपाय यासंबंधी शिक्षकांकडूनच प्रॅक्टिकल करून घेण्यात आले. या कार्यशाळेसाठी कोटक एज्युकेशन फाउंडेशनचे गणेश विद्यामंदिर शाळेसाठी असलेले फॅसिलिटेटर संदीप कुमार व त्यांचे सहकारी जान्हवी यांनी खूप मेहनत घेतली.



## एसटी कर्मचाऱ्यांसाठी कॅशलेस रुग्णालय

**ठाणे (राकेश गायकवाड) :** राज्यातील अनेक बसस्थानके बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा, या तत्त्वावर विकसित करण्यात येत आहेत. या एस.टी. आगारांमध्ये प्रत्येक जिल्ह्यात २५, तर मुंबईतील बोरिवली येथील आगारात १०० खाटांचे रुग्णालय एस.टी. कर्मचाऱ्यांसाठी सुरू करण्यात येणार आहे.

या रुग्णालयात एस.टी. कर्मचाऱ्यांवर महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून उपचार करण्यात येतील, तसेच ५ लाखांपर्यंतच्या शस्त्रक्रियांचा खर्च राज्यशासन करेल, अशी योजना राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शनिवारी जाहीर केली. बसस्थानकातच एस.टी. कर्मचारी, अधिकाऱ्यांना माफक दरात नाष्टा, जेवण कसे मिळेल, यासाठी उपहारगृह सुरू करण्याचाही मानस परिवहनमंत्र्यांनी व्यक्त केला.

# मीरा भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालयात पोलीस अधिकाऱ्यांमध्ये पदावरून रस्सीखेच



**मीरारोड (विशाल पाटील )** मीरा भाईंदर - वसई विरार पोलीस आयुक्तालयात परत आलेल्या ७ पोलीस निरीक्षकांच्या नियुक्त्या अजून गुलदस्त्यात आहेत. तर निवडणूक काळात अन्य भागातून बदली होऊन आलेले आयुक्तालयातील १५ पोलीस ठाण्यांचे प्रभारी आणि काही सेकंड पीआय अश्या सुमारे १९ निरीक्षकांनी त्यांच्या कडील नुकताच दिलेला पोलीस ठाणे प्रभारीचा पदभार काढून घेण्याचा अन्याय होऊ नये म्हणून मॅट मध्ये धाव घेतली आहे. त्यामुळे पोलीस अधिकाऱ्यांमध्ये जुंपल्याचे चित्र आहे.

पोलीस आयुक्तालयात ३ वर्षा पेक्षा जास्त काळ कार्यरत अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याच्या केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानंतर विलंबाने परंतु आचार संहिता सुरु झाल्यानंतर ३० ऑक्टोबर रोजी पोलीस आयुक्तालयातील ३८ पोलिस निरीक्षक यांच्या बदल्या केल्या गेल्या होत्या. मुंबई आदी भागातून बदली होऊन आलेल्या ३६ पोलीस निरीक्षकांच्या ४ नोव्हेम्बर रोजी मीरा भाईंदर - वसई विरार आयुक्तालयातील विविध पोलीस ठाणे आदी ठिकाणी नियुक्त्या केल्या गेल्या. मिभा - ववी आयुक्तालयातून बदली झाल्याने अनेक नाराज अधिकारी यांनी मॅट मध्ये धाव घेतली. त्यावर सुनावणीची १४ जानेवारी रोजीची तारीख आहे. दरम्यान पोलीस महासंचालक कार्यालयाने ३१ डिसेंबर रोजी पोलीस निरीक्षकांच्या बदली आदेशाने मिभा - ववी आयुक्तालयातून निवडणूक काळात बदली होऊन गेलेल्या संजय हजारे, जितेंद्र वनकोटी, राजेंद्र कांबळे, चंद्रकांत सरोदे, विलास सुपे, दिलीप राख व सुधीर गवळी ह्या ७ वरिष्ठ पोलीस निरीक्षकांची पुन्हा घरवापसी केली. घरवापसी केल्यानंतर ते अधिकारी ९ जानेवारी रोजी मिभा - ववी आयुक्तालयात हजर झाले आहेत . त्या पोलीस अधिकाऱ्यांना ते आधी कार्यरत असलेली पोलीस ठाणी मिळण्याची आशा आहे. कारण त्यांची झालेली बदली ही अन्यायकारक होती असा त्यांचा दावा आहे.

# वसई, पालघरचे वनक्षेत्र ३५ टक्क्यांनी घटले, भूमाफियांकडून जंगलतोड



**वसई (सतीश सोनावणे) :** नैसर्गिक वनसंपदा असलेल्या पालघर जिल्ह्यातील वनक्षेत्र तब्बल ८७ चौरस किलोमीटर घटले आहे. 'इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट रिपोर्ट' (आयएसएफआर) अहवालातून ही धक्कादायक माहिती समोर आली आहे. भूमाफियांकडून होणारे भराव, बांधकामे आणि झांडाची कत्तल होत असल्याने हिरवा पट्टा नष्ट होऊ लागला असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. विशेष म्हणजे राज्यातील २४ जिल्ह्यातील १ हजार ७७८ वनक्षेत्र घटले असून त्यात सर्वाधिक घट ही पालघर जिल्ह्यातील आहे.

पालघरच्या पश्चिमेला सागरी किनारा, पूर्वेकडे डोंगर असल्याने हा जिल्हा निसर्गरम्य आणि पर्यटनासाठी ओळखला जातो. पालघर जिल्ह्यातील नैसर्गिक जंगलामुळे पर्यावरणाचा समतोल राखला जात असतो. मात्र गेल्या काही वर्षांपासून भूमाफियांनी मोठ्या प्रमाणावर जंगलतोड करून अनधिकृत बांधकामे करण्यास सुरवात केली आहे. वनखात्याच्या जमीनीवर अतिक्रमण करून अनधिकृत बांधकामे होत आहे. यामुळे जिल्ह्यातील हिरवा पट्टा नष्ट होऊ लागला आहे. 'इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट रिपोर्ट' (आयएसएफआर) या संस्थेने राज्यातील वनक्षेत्राच्या सद्यस्थितीचा अहवाल प्रसिध्द केला आहे. या अहवालातून हे भीषण वास्तव समोर आले आहे.

पालघर जिल्ह्यात वन क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विस्तार आहे. पर्यावरणाच्या अनुषंगाने जंगलाचे व पशुपक्ष्यांचे संवर्धन व्हावे, म्हणून वन विभागामार्फत एकूण २४८.३८ चौरस किलोमीटर राखीव क्षेत्राची घोषणा वनविभागाने केली होती. त्यानुसार जव्हार (११८.२८) डहाणू ( ४९. १५) आणि धामणी येथे धामणीमध्ये (८०.९५) चौरस किलोमीटर राखीव वनक्षेत्रे आहेत. याशिवाय पालघर, वसई, तलासरी, डहाणू, जव्हार, मोखाडा, विक्रमगड, वाडा तालुक्यात वनहक्क पट्ट्यांचे क्षेत्र २८ हजार ९०० हेक्टर इतके आहे. मात्र भू माफियांनी अनधिकृत बांधकाम करण्यासाठी मोठ्या प्रमाणवर जंगलतोड करून वनक्षेत्रावर कब्जा केला आहे. त्यामुळे ८७ चौ.कि.मी. म्हणजेच एकूण वनक्षेत्राच्या ३५ टक्के वनक्षेत्र घटले आहे.

### वसई विरार मधील वनविभागाच्या जागेवर अतिक्रमण

वसई विरार मध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे होत आहे. त्यात सर्वाधित बांधकामे ही वनखात्याच्या जागेवर होत आहेत. राजवली, वाघरळ पाडा येथे वनखात्याच्या जमिनीनवर जंगलतोड करून मोठमोठ्या अनधिकृत वसाहती उभ्या राहिल्या आहेत.

### राज्यातील २४ जिल्ह्यांनी वनक्षेत्र गमावले

महाराष्ट्र देशातील सर्वाधिक म्हणजे १४,५२५ चौ.कि.मी इतके सर्वात जास्त वृक्षाच्छादन आहे. 'इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट रिपोर्ट' (आयएसएफआर) अहवालानुसार २०२१ ते २०२३ या दोन वर्षात राज्यातील ३६ पैकी २४ जिल्ह्यांनी एकूण १ हजार ७७८ चौ.कि.मी. खुले जंगल आणि २६७ चौ.कि.मी. झुडपी जंगल गमावले आहे. त्यात सर्वाधिक ८७ चौरस किलोमीटर वनक्षेत्र पालघर जिल्ह्यातील घटले आहे.

# "साताऱ्याची माणसं 'THAR' वेडी...", म्हणत 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम अभिनेत्याने घेतली नवीन गाडी!





आपल्या हक्काचं घर आणि गाडी असावी असं स्वप्न प्रत्येकाचं असतं. गेल्या काही वर्षात मराठी कलाविश्वातील अनेक कलाकारांनी नवीन घरं आणि गाड्या खरेदी करत आपली स्वप्नपूर्ती केल्याचं पाहायला मिळालं. आता आणखी एका मराठी अभिनेत्याचं घरासह नव्या गाडीचं स्वप्न पूर्ण झालेलं आहे. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमातून घराघरांत लोकप्रिय झालेला अभिनेता रोहित माने याने काही दिवसांपूर्वीच नवीन घर खरेदी केलं होतं. आता या पाठोपाठ अभिनेत्याच्या घरी 'THAR' या नव्या गाडीचं आगमन झालेलं आहे.

'महाराष्ट्राची हास्यजत्रा' हा विनोदी कार्यक्रम जगभरात लोकप्रिय आहे. या कार्यक्रमामुळे अनेक कलाकारांना घराघरांत एक वेगळी ओळख मिळाली. अनेक नवोदित कलाकार प्रकाशझोतात आले. यापैकीच एक म्हणजे रोहित माने. रोहितने गेल्यावर्षी आपल्या पत्नीसह नव्या घरात गृहप्रवेश केला होता. आता नव्या गाडीमुळे अभिनेत्याचं आणखी एक स्वप्न पूर्ण झालं आहे.

रोहित हा मूळचा साताऱ्याचा आहे. त्यामुळे गाडी खरेदी करतानाच्या व्हिडीओला त्याने "साताऱ्याची माणसं 'THAR' वेडी" असं हटके कॅप्शन दिलं आहे. अभिनेत्यासह त्याचं संपूर्ण कुटुंब ही गाडी खरेदी करताना उपस्थित होतं. रोहितने बायकोसह या नव्या थारची शोरुममध्ये पूजा केली आणि त्यानंतर गाडीसह फोटोशूट केलं. याशिवाय अभिनेत्याच्या कुटुंबीयांनी देखील या नव्या गाडीची पूजा केली. या स्वप्नपूर्तीचा आनंद रोहित अन् श्रद्धाच्या चेहऱ्यावर अगदी स्पष्टपणे दिसत आहे.

रोहितच्या या नव्या गाडीच्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. निखिल बने, प्रियदर्शिनी इंदलकर, चेतना भट, वनिता खरात, चेतन गुरव, ऋजुता देशमुख, पृथ्वीक प्रताप, स्नेहल शिदम, नम्रता प्रधान या सगळ्या कलाकारांनी रोहितच्या व्हिडीओवर कमेंट्स करत त्याला शुभेच्छा दिल्या आहेत. तर नेटकऱ्यांनी सुद्धा या नव्या गाडीसाठी रोहितचं भरभरून कौतुक केलं आहे. अनेकांनी "व्हिडीओ पाहून अंगावर काटा आला अशीच प्रगती कर" असं कमेंट्समध्ये म्हटलं आहे.

# कार्तिक आर्यनला दहा वर्षानंतर मिळाली इंजिनिअरिंगची पदवी



बॉलीवूड अभिनेता कार्तिक आर्यन याला नवी मुंबईतील डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात पदवी प्रदान करण्यात आली. तब्बल एक दशकानंतर कार्तिकने ही पदवी मिळवली आहे. शनिवारी (११ जानेवारी २०२४) रोजी कार्तिकने आपल्या इन्स्टाग्रामवर या समारंभाचे काही क्षण शेअर केले, जिथे तो विद्यार्थ्यांबरोबर नाचताना आणि आपल्या कॉलेजच्या आठवणींमध्ये रमताना दिसला.

कार्तिकने इन्स्टाग्रामवर व्हिडिओ शेअर करत लिहिले, "बॅकबेंचरपासून मंचावर उभं राहून पदवी स्वीकारण्यापर्यंतचा हा प्रवास खूपच सुंदर आहे." पुढे त्याने लिहिले, "डी. वाय. पाटील कॉलेजने मला खूप आठवणी दिल्या, स्वप्न दिली आणि अखेर माझी पदवीही दिलीत (त्यासाठी फक्त दहा वर्ष लागले!). विजय पाटील सर, माझे अद्भुत शिक्षक, आणि येथील तरुण स्वप्नवेड्या विद्यार्थ्यांनो, तुमच्या प्रेमासाठी धन्यवाद – मला माझ्या घरी परत आल्यासारखं वाटतंय."

या व्हिडिओमध्ये कार्तिकने त्याचे नाव असलेले जर्सी जॅकेट घातले होते, जिथे तो विद्यार्थ्यांनी खचाखच भरलेल्या सभागृहाला संबोधित करताना दिसला. समारंभाचा मुख्य क्षण म्हणजे कार्तिकने मंचावर विद्यार्थ्यांबरोबर त्याच्या 'भूलभुलैया ३' चित्रपटाच्या टायटल ट्रॅकवर नृत्य सादर केले.

व्हिडीओमध्ये कार्तिक आपल्या कॉलेजमध्ये परतताना विद्यार्थ्यांच्या प्रचंड टाळ्यांच्या कडकडाटात व स्वागतात येताना दिसला आहे. कॅम्पसमधून फिरताना तो आपल्या शिक्षकांशी संवाद साधत जुन्या आठवणींमध्ये रमताना दिसला. याच दरम्यान, त्याने कॉलेज बोर्डवर सही करून या भेटीची आठवण सोडली. या व्हिडीओमध्ये कार्तिकचे अनेक क्षण दिसून येतात. तो चाहत्यांशी गप्पा मारताना दिसला आहे, या व्हिडीओत त्याचे काही चाहते त्याला भेटवस्तू देताना दिसले. याचवेळी कार्तिकची एक चाहती त्याला भेटून रडली. कार्तिकने अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असतानाच २०११ मध्ये लव रंजनच्या 'प्यार का पंचनामा' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केले होते. २०२३ मध्ये कार्तिकच्या 'चंदू चॅम्पियन' आणि 'भूलभुलैया ३' या चित्रपटांनी चांगली कामगिरी केली.

# 'कोकण हार्टेड गर्ल'ची लगीनघाई! अंकिता-कुणालचं पार पडलं पहिलं केळवण, फोटो आला समोर, लग्नपत्रिका पाहिलीत का?

'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वापासून अंकिता वालावलकर घराघरांत लोकप्रिय झाली. शोमध्ये सहभागी झाल्यावर अंकिताने पहिल्याच आठवड्यात 'बिग बॉस' संपल्यावर लग्नबंधनात अडकणार असल्याचं सांगितलं होतं. महाअंतिम सोहळा पार पडल्यावर अंकिताला सर्वत्र लग्नाविषयीचे प्रश्न विचारले जात होते. अखेर दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर कोकण हार्टेड गर्लने होणाऱ्या नवऱ्याचा चेहरा रिव्हिल करत, लोकप्रिय मराठी संगीत दिग्दर्शक कुणाल भगतसह लग्नबंधनात अडकणार असल्याचं जाहीर केलं.

अंकिता आणि कुणाल येत्या काही दिवसात लग्नबंधनात अडकणार आहेत. सध्या 'कोकण हार्टेड गर्ल'च्या घरी लगीनघाई सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. अंकिता आणि कुणाल यांचं पहिलं केळवण नुकतंच पार पडलं आहे. याचा फोटो तिने इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केला आहे.

पहिल्या केळवणासाठी अंकिता व कुणालने पारंपरिक लूक केल्याचं पाहायला मिळत आहे. या जोडप्यासाठी नातेवाईकांनी खास जेवणाचा बेत केला होता. फुलांची सजावट करुन मधोमध केळीच्या पानावर 'केळवण' असं लिहिण्यात आलं होतं. मात्र, या दोघांनी अद्याप लग्नाची तारीख उघड केलेली नाही. त्यामुळे अंकिता नेमकी केव्हा विवाहबंधनात अडकणार याची तिचे चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. अंकिताने काही दिवसांपूर्वीच तिच्या लग्नपत्रिकेची झलक इन्स्टाग्रामवर शेअर केली होती. या जोडप्याच्या लग्नपत्रिकेला केळीच्या पानाची डिझाइन करण्यात आली आहे. अंकिताने परंपरेनुसार सर्वप्रथम गावच्या मंदिरात आपल्या लग्नाची पत्रिका ठेवली होती.






## कुणालने लोकप्रिय मालिकांना दिलंय संगीत

अंकिताच्या होणाऱ्या नवऱ्याबद्दल सांगायचं झालं, तर कुणाल भगत मराठी सिनेविश्वात सक्रिय आहे. अलीकडेच प्रदर्शित झालेल्या 'येक नंबर' चित्रपटासाठी त्याने संगीत दिग्दर्शक म्हणून काम पाहिलं होतं. याशिवाय 'झी मराठी'ची मालिका 'लक्ष्मी निवास', आगामी मालिका 'तुला जपणार आहे' यांनाही कुणालने संगीत दिलेलं आहे. कुणाल-करण अशी या संगीतकारांची जोडी असून, या दोघांनी मिळून अनेक प्रोजेक्ट्ससाठी काम केलेलं आहे. दरम्यान, आता पहिलं केळवण पार पडल्यावर अंकिता लग्नबंधनात केव्हा अडकणार याची तिचे चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत.

# नावीन्यपूर्ण अनुभव देणारा चित्रप्रयोग



'संगीत मानापमान' हा चित्रपट ११३ वर्षे जुन्या संगीत नाटकावर आधारित आहे. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी लिहिलेल्या आणि गोविंदराव टेंबे यांनी संगीतबद्ध केलेल्या गाण्यांनी नटलेले 'मानापमान' हे संगीत नाटक मराठी रंगभूमीच्या इतिहासातील सुवर्णपान आहे. मात्र या नाटकाची रंजक परीकथा आणि त्यातली गाजलेली निवडक गाणी यांचा समावेश वगळला तर सुबोध भावे दिग्दर्शित 'संगीत मानापमान' हा चित्रपट मूळ नाटकापेक्षा पूर्ण भिन्न अनुभव आहे. 'मानापमान' नाटकाच्या चष्म्यातून हा चित्रपट पाहणं योग्य ठरणार नाही. 'संगीत मानापमान' या चित्रपटाच्या शीर्षकातच संगीत आहे, त्यामुळे पहिल्या दृश्यचौकटीपासून गाणी आपल्याला साथ करतात. मूळ नाटकातील कथा ही प्रेमकथा आहेच, शिवाय काहीशी जुन्या परिचित धाटणीची म्हणजे नायक-नायिका आणि खलनायक अशी ढोबळ मांडणी असलेली आहे. तरीही शतकापूर्वी लिहिलेल्या या नाटकाची नायिका भामिनी, राणीसाहेब ही मध्यवर्ती व्यक्तिरेखा आणि अगदी नायक धैर्यधराची आई चिमणाबाई या तिन्ही स्त्री व्यक्तिरेखा अत्यंत तडफदार, स्वतंत्र बाण्याच्या आणि आपल्याला काय हवे आहे याची स्पष्टता घेऊन जगणाऱ्या आहेत. संग्रामपूर नामक संस्थानाची ही कथा आहे. या संस्थानाची धुरा राणीसाहेबांच्या हातात आहे. त्यांचे राज्य सक्षमपणे चालवणारे काकासाहेबांसारखे हुशार, पराक्रमी आणि संयमी व्यक्तिमत्त्वाचे सेनापती आहेत. भामिनी ही काकासाहेबांची कन्या. श्रीमंतीत आणि काहीशी लाडाकोडात वाढलेली भामिनी. संग्रामपूरचे उपसेनापती चंद्रविलास आणि भामिनी यांची लहानपणापासूनची मैत्री आहे. मात्र, चंद्रविलासने मनातल्या मनात भामिनीची भावी सहचारिणी म्हणून चित्रे रंगवायला सुरुवात केली आहे.

# 'मिशन अयोध्या' वेगळा विषय मांडण्याचा प्रयत्न

अयोध्येतील राम मंदिराचे उद्घाटन आणि मंदिरात रामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा या घटनेला वर्षपूर्ती होत असल्याच्या पार्श्वभूमीवर 'मिशन अयोध्या' या आगामी चित्रपटातून एक वेगळा विषय मांडण्याचा प्रयत्न दिग्दर्शक समीर सुर्वे यांनी केला आहे. राम मंदिर झाले, आता पुढे काय? रामाने दिलेल्या विचार जनमानसापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत, अशा आशयाची मांडणी असलेला हा चित्रपट येत्या २४ जानेवारीला चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. आर. के. योगिनी फिल्म्स प्रॉडक्शन निर्मित आणि समीर सुर्वे दिग्दर्शित 'मिशन अयोध्या' चित्रपटाचा ट्रेलर लाँच सोहळा महंत रामगिरी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती संभाजीनगर येथे नुकताच पार पडला. या चित्रपटाच्या निमित्ताने दिग्दर्शक समीर सुर्वे यांच्याशी साधलेला हा संवाद. रामराज्याच्या विचारांनी कथेची गुंफण आपल्या देशात हजारो राम मंदिर आहेत, परंतु इतिहास आणि संघर्षामुळे अयोध्येतील राम मंदिर वैशिष्ट्यपूर्ण ठरते. पण अयोध्येतील राम मंदिराच्या निर्माणानंतर पुढे काय? असा प्रश्न आपसूकच मनात निर्माण झाला. आपण रामराज्याकडे वाटचाल करू शकतो का? अयोध्येतील राम मंदिर ही रामराज्याची सुरुवात असायला हवी, पुढच्या पिढ्यांना श्रीरामाचा इतिहास सांगायला हवा, या विचारांनी 'मिशन अयोध्या' या चित्रपटाची कथा गुंफली गेली असल्याचे समीर सुर्वे यांनी सांगितले.अयोध्येतील राम मंदिर परिसरात चित्रीकरण अयोध्येतील मंदिर परिसरात या चित्रपटाचे चित्रीकरण झाले असून राममूर्तीचे दर्शन आणि मंदिराची सफर प्रेक्षकांना रुपेरी पडद्यावर अनुभवता येणार आहे. अयोध्येत चित्रित होणारा 'मिशन अयोध्या' हा भारतातील पहिलाच चित्रपट आहे.



कलाकार व तंत्रज्ञांचा संपूर्ण चमू, वीस लहान मुलांना सांभाळणे आणि सर्व साहित्य घेऊन अयोध्येत चित्रीकरण करणे आव्हानात्मक होते. महाराष्ट्रातील वातावरण आणि अयोध्येतील वातावरणात प्रचंड फरक आहे, कडेकोट सुरक्षा व्यवस्था आणि अनोळखी व्यक्ती, अशा सर्व गोष्टींना सामोरे जाऊन चित्रीकरण पूर्ण केले, अशी आठवणही सुर्वे यांनी सांगितली. नवोदित कलाकारांवर भर कलाकारांची निवड करण्यापूर्वी एक कार्यशाळा आयोजित केली होती आणि या कार्यशाळेतून वीस लहान मुलांची निवड केली. त्यानंतर सर्व मुलांना अभिनयाचे प्रशिक्षणही दिले. या सर्व लहान मुलांनी जबरदस्त मेहनत घेतली असून अप्रतिम अभिनय केला आहे, अशी कौतुकाची पावती दिग्दर्शक समीर सुर्वे यांनी दिली. चित्रपटाची निर्मिती करण्यापूर्वी तुलनेने नवोदित व कमी अनुभव असलेल्या कलाकारांची निवड करण्याचे ठरविले होते. प्रसिद्ध कलाकारांना घेऊन काम केले असते, तर चित्रपट पूर्णत्वास गेला नसता. अयोध्येतील रखरखत्या उन्हात आणि कमी वेळेत चित्रीकरण करायचे होते, त्यामुळे या गोष्टींना प्रस्थापित कलाकारांचा पाठिंबा आणि सहकार्य मिळाले नसते. नवीन कलाकार हा १०० टक्के झोकून देऊन काम करतो, शिवाय प्रस्थापित कलाकारांचे भरमसाट मानधन निर्मात्याला परवडणारे नसते, मी एक निर्माता व दिग्दर्शक असल्यामुळे या गोष्टींची जाणीव आहे, असेही त्यांनी सांगितले.

# शिकायला गेलो एक! व्यंकूची 'आज'ची शिकवणी



द. मा. मिरासदार हे उत्तम विनोदी लेखक म्हणून सुपरिचित आहेत. कालौघात ते वाचकांच्या स्मरणातून थोडेसे मागे पडले असले तरी नाटकवाल्यांना स्वतंत्र विषय न मिळाला तर त्यांच्या एखाद्या कथेवर नाटक बेतून स्पर्धेत बाजी मारता येते हे नाटकवाल्यांना बरीक ठाऊक आहे. लग्न आणि तत्सम विषयांच्या चाकोरीत अडकलेल्या अभिनेते प्रशांत दामले यांनाही त्या प्रचलित चाकोरीचा कंटाळा येऊन तेही एक वेगळा विषय म्हणून द. मां. च्या 'व्यंकूची शिकवणी' या खुसखुशीत कथेवर आधारित अद्वैत दादरकर लिखित-दिग्दर्शित 'शिकायला गेलो एक!' हे नवं नाटक घेऊन आले आहेत. फक्त त्यांनी एक केलं आहे, की त्या कथेची वन लाईन घेऊन त्यांनी नाटक आजच्या काळात घडवलं आहे. त्यामुळे द. मां.च्या कथेला समकालीनता लाभली आहे. महेश साने हे नाकासमोर चालणारे, साधेभोळे, आदर्श शिक्षक. त्याबद्दल त्यांना गौरवान्वित करण्याचा सोहळा संपन्न होत असतानाच कोल्हापूरचे आमदार खराडे हे आपल्या वर्षानुवर्षे दहावीची वारी करणाऱ्या या मुलाला-शामला सानेंची शिकवणी लावून त्याची एकदा नय्या दहावीपार करायचं मनाशी पक्कं ठरवूनच आदर्श शिक्षक असलेल्या महेश सानेंच्या घरी येतात. पण अशा घोडनर्व या, अभ्यासापेक्षा इतर उचापतींतच रस असणाऱ्या या मुलाला आपण काय शिकवणार असा सानेंना प्रश्न पडतो. त्यामुळे ते आमदार खराडेंना साफ नकार देतात. पण खराडे त्यांच्या अक्षरशः खनपटीलाच बसतात. तेव्हा सानेंची मुलगी विद्या त्यांना भरमसाठ फी आणि इतर काही अटी घालते. घायकुतीला आलेले खराडे तत्काळ त्यांच्या या अटी मान्य करतात. शेवटी सानेंचा नाइलाज होतो. ते शामची शिकवणी घेण्याचं मान्य करतात. पण शामला इतर भरपूरच छंदफंद असल्याने तो त्यांच्याकडे शिकण्यास साफ नकार देतो. आता हे आव्हान कसं पेलायचं हे सानेंसमोर मोठंच आव्हान उभं ठाकतं. ते त्याला आधी बाबापुता करून पाहतात. पण तो त्याला भीक घालत नाही. शेवटी ते त्यालाच विचारतात, की बाबा, तू काय केलं म्हणजे शिकशील? तो म्हणतो, मी सांगेन ते केलंत तर मी तुमच्याकडे शिकीन. ते त्याची अट मान्य करतात. तो त्यांना तंबाखू खायला देतो. ते नाइलाजानं तो खातात. आता त्याला त्यांच्याकडे शिकण्याशिवाय पर्याय उरत नाही. तोही मग नाइलाजानं पुस्तकं हाती घेतो. पण एकेक धडे शिकण्यासाठी तो सानेंना नाना गोष्टी करायला भाग पाडतो. त्यांना दारू, बाई, पब, डेटिंग ॲप वगैरेंचा नाद लावतो. त्यामुळे नेमकं कोण कुणाची शिकवणी घेतोय हेच कळेनासं होतं. आदर्श शिक्षकाचा पार चोळामोळा करून शाम त्याला आपल्या तालावर नाचणारं प्यादं बनवून टाकतो. शिक्षकच विद्यार्थ्याची शिकवणी लावतो जणू.




**मेष** – आजच्या दिवशी तुम्ही आराम करु शकाल. शरीराला तेलाने मसाज करुन तुमचे स्नायू मोकळे करा. दीर्घ मुदतीसाठी गुंतवणूक केलीत तर तुम्हाला भरघोस नफा होईल.

**वृषभ** – शारीरिक आजारातून बरे होण्याचे शक्यता मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे तुम्ही खेळाच्या स्पर्धांमध्ये भाग घेऊ शकाल.

**मिथुन** - तुमच्या उद्धट वागण्यामुळे तुम्ही बायकोचा मूड घालवाल. नातेसंबंधामध्ये समारेच्या व्यक्तीबद्दल अनादर दाखविणे आणि त्या व्यक्तीला गृहित धरणे यामुळे संबंध बिघडतात हे तुम्हाला समजायला हवे.

**कर्क** – आपल्या मुलांच्या कामाचा तुम्हाला अपरिमित आनंद होईल. ज्या लोकांनी कुणाकडून उधार घेतलेले आहे त्यांना आज कुठल्या ही परिस्थितीत उधार चुकवावे लागू शकते ज्यामुळे आर्थिक स्थिती थोडी कमजोर होईल.

**सिंह** – सामाजिक स्नेह मेळावे आणि रम्य सहली तुम्हाला आनंदी आणि रिलॅक्स करतील. आज तुम्ही मित्रांसोबत पार्टीमध्ये खूप पैसा खर्च करू शकतात परंतु, तरी ही तुमचा आर्थिक पक्ष आज मजबूत राहील.

**कन्या** – तुमच्या संशयी स्वभावामुळे तुम्हाला पराभवाला सामोरे जावे लागेल. जमीन किंवा कुठल्या प्रॉपर्टीमध्ये गुंतवणूक करणे आज तुमच्यासाठी घातक होऊ शकते जितके शक्य असेल तितके या गोष्टींमध्ये गुंतवणूक करण्यापासून सावध राहा.

**तूळ** – तुमच्या आशेचा पतंग एखाद्या उंची अत्तरासारखा आणि डुलणाऱ्या फुलासारखा दरवळेल.

**वृश्चिक** – यश हातातोंडाशी येण्याची शक्यता वाटताना आपली ताकद कमी होत जाण्याची भावना निर्माण होईल.

**धनु** – तुमचे आवडते स्वप्न प्रत्यक्षात येईल. परंतु तुमचा उत्साह नियंत्रणात ठेवा. कारण खूप आनंदी होणे हे कधी कधी समस्येत टाकू शकते.

**मकर** – तुमच्या विचारांवर ज्यांचा असाधारण प्रभाव आहे अशा विशेष व्यक्तीची ओळख मित्रामुळे होऊ शकते.

**कुंभ** – प्रेम, आशा, विश्वास, सद्भावना, आशावादी आणि निष्ठा अशा सकारात्मक भावना स्वीकारण्यासाठी तुमच्या मनाला उद्युक्त करा.

**मीन** – स्वतःच स्वतःवर औषधोपचार करू नका, त्यामुळे औषधावर विसंबण्याची सवय वाढू शकेल.

# श्रीवर्धन येथे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन संपन्न

## ■ गोखले विद्यालय आणि पंचायत समिती यांचं संयुक्त आयोजन

**श्रीवर्धन (फरीद डावरे) -** पंचायत समिती श्रीवर्धन(शिक्षण विभाग), विज्ञान,गणित मंडळ व गोखले एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने शाश्वत भविष्यासाठी'विज्ञान आणि तंत्रज्ञानातील एकात्मिक दृष्टीकोन' या विषयांतर्गत न्यू इंग्लिश स्कूल आराठी(श्रीवर्धन)येथे नुकतच ५२व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञानात स्वारस्य वाढवणे त्याबरोबरच कल्पनाशक्ती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी आयोजित या दोन दिवसीय विज्ञान प्रदर्शनात तालुक्यातील२९ प्राथमिक व२२ माध्यमिक मान्यताप्राप्त शाळांनी सहभाग नोंदवला. प्राथमिक शालेय विभागात ६वी ते८वी गटात ४४,माध्यमिक विभागातून ९वी ते१२वी गटात ४२, प्राथमिक शिक्षकांचे२, माध्यमिक शिक्षकांचे ४,लॅब अटेंडंट२असे एकूण९४ विज्ञान स्पर्धा प्रकल्प प्रदर्शनात सहभागी झाले होते.गोखले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीवर्धन पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली व गोखले महाविद्यालयाचे उपप्राचार्य किशोर लहारे,पंचायत समितीचे वरिष्ठ विस्तार अधिकारी धर्मा धामणकर आणि आराठीमधल्या इंग्लिश माध्यमाच्या मुख्याध्यापिका वैशाली सावंत यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या विज्ञान प्रदर्शनाला विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भेट दिली.श्रीवर्धनच्या उपविभागीय पोलिस अधिकारी सविता गर्जे यांनी या विज्ञान प्रदर्शनाला भेट देऊन सर्व विज्ञान प्रकल्पांची पाहणी केली व प्रदर्शनात सहभागी विद्यार्थांशी हीतगुज साधून त्यांचं कौतुक केलं.विज्ञान प्रतीकृती(६वी ते८वी) गटात कुआनम मलबारी-ए.आय.जे.विद्यालय श्रीवर्धन-प्रथम क्रमांक,(९वी ते१२वी) गटात कु.श्रवण साळुंखे,गोखले शिक्षण संस्था संचलित न्यु इंग्लिश मीडियम स्कूल-आराठी -प्रथम क्रमांक,शैक्षणिक साहित्य निर्मीती,(प्राथमिक गट)श्रीमती रुपाली शिसोदे, किसान हायस्कूल वाळवटी-प्रथम क्रमांक,(माध्यमिक गट)शेख इलीयास-अंजुमन हायस्कूल श्रीवर्धन-प्रथम क्रमांक,प्रायोगिक साधनांचे प्रदर्शन(प्रयोगशाळा परिचर गट) भिकुराम गोरेगावकर-अ.स.ई.अंतुले हायस्कूल दिघी-प्रथम क्रमांक,वक्तृत्व स्पर्धा (उच्च माध्यमिक गट) कु.इराम परकार-डॉ. ए.आर.उंड्रे ज्यु.कॉलेज बोर्ली पंचतन-प्रथम क्रमांक,(६वी ते८वी)प्राथमिक गट हिमांशू पाटील-र.ना.राऊत विद्यालय श्रीवर्धन-प्रथम क्रमांक,(९वी ते१०वी) माध्यमिक गट कु. अथर्व यवतकर-र.ना. राऊत विद्यालय श्रीवर्धन-प्रथम क्रमांक,निबंध स्पर्धा (११वी१२वी) उच्च माध्यमिक विभाग कु. अमन अराई-अंजुमन इस्लाम ज्यु.कॉलेज श्रीवर्धन-प्रथम क्रमांक,निबंध स्पर्धा(६वी ते ८वी)माध्यमिक गट कु.मीत मोरे-आदगाव हायस्कूल-प्रथम क्रमांक,निबंध स्पर्धा(९वी ते१२वी) मोठा गट कु.लक्ष जैन-को.उ.मि. मंडळ संचलित र.ना.राऊत इंग्लिश मीडियम स्कूल श्रीवर्धन-प्रथम क्रमांक.या स्पर्धकांनी घवघवीत यश मिळवले.या स्पर्धा प्रकल्पांचं परीक्षण गोखले महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागाचे प्रा.बी.यु.पाटील, म्हसळा तालुक्यातील माध्यमिक शाळांचे शिक्षक विनय सोनवणे,सुकलाल पाडवी, किरण चाळके,ईश्वर तडवी यांनी केलं.



SPORT

## Rohit Sharma To Step Down As Captain? Blockbuster Update On Captain's Future Out



**NEW DELHI :** The BCCI held a review meeting to discuss India's forgettable Australia tour on Saturday (January 11). The officials held discussions over a range of issues. They also discussed the road ahead for captain Rohit Sharma and former captain, Virat Kohli. While there was no announcement regarding Rohit's future as captain, there is a blockbuster update on him. Dainik Jagran has reported that Rohit will stay captain till the 2025 Champions Trophy. Rohit reportedly told the BCCI that he would fully support his successor. Rohit's future as the Test captain is in doubt. Jasprit Bumrah captained India in two Tests Down Under and he will be an automatic replacement for Rohit. Bumrah-led India kicked off the Border-Gavaskar Trophy with a win. As far as ODI cricket goes, Shubman Gill was appointed the vice-captain of the white-ball teams in 2024. Rohit might continue as the ODI captain as there is no ready-to-go replacement for him. India enjoyed huge success under him and made it to the final of the 2023 ODI World Cup.

## Yograj Singh praises MS Dhoni, after years of blaming him for Yuvraj's retirement

**NEW DELHI :** Yuvraj Singh's father Yograj has made a massive U-turn of stand towards MS Dhoni. Yograj who has blamed MS Dhoni multiple times for cutting his son's international career short has praised the former skipper in a recent interview. Speaking on Unfiltered by Samdish, Yograj praised MS Dhoni for his fearless attitude.



The former India cricketer, currently 66, still coaches budding cricketers. Known for his fiery personality, Yograj had once said that he would never forgive MS Dhoni in his life. However, in the video interview with Samdish, Yograj softened his stance against the former India captain and praised him for his intelligence in the field.

"I find Dhoni as a very motivated captain, who can tell people what to do. The best thing about Dhoni was that he could read the wicket can tell bowlers where to bowl," Yograj Singh said on 'Unfiltered by Samdish', a YouTube show.

"What I liked the most about him was that he was a fearless men. If you remember in Australia, he was hit on the grill my Mitchell Johnson and he didn't moved a bit, he stood there and next ball he pulled him for a six. Aise log kaafi kam hote hai (There are very few people like him)," he said.

In 2024, during an interview with Zee, Yograj said that he would not forgive MS Dhoni. A fiery Yograj Singh had blamed MS Dhoni for his son's early retirement.

"I won't forgive MS Dhoni. He should look at his face in the mirror. He is a very big cricketer, but what he has done against my son, everything is coming out now; it can never be forgiven in life.

## 'Will remain Test captain' - Rohit to selectors amid retirement talks

**NEW DELHI :** Rohit Sharma will play the England Tests later this year, as he plans to continue as the captain unless the BCCI zeroes in on his successor, per the latest report. Sharma, who faced severe wrath for his poor show Down Under, wherein he returned with just 31 runs across three Tests, let alone discussing his mediocre captaincy, was part of a review meeting in Mumbai on Saturday (Jan 11).



Per a report in Dainik Jagran, Rohit agreed to remain the national team's skipper across formats, adding regardless of who his successor is, he will get the dressing room's complete support.

Also read | Suspended Shakib finds no place in Bangladesh Champions Trophy squad

Besides, discussions around his ODI future were also held, with the selectors to take a call on his successor in the One-Day format after the ICC Champions Trophy 2025.

Earlier last year, ace T20I batter Suryakumar Yadav replaced Rohit as the new captain in the shortest format. Rohit, Virat Kohli and Ravindra Jadeja announced their T20I retirements following winning the T20 World Cup in the Americas.\ India's premier seamer Jasprit Bumrah's name as Rohit's successor, mainly in Tests, was also discussed, with all present, including chief selector Ajit Agarkar, board members, the head coach Gautam Gambhir and Rohit, sharing apprehensions over the same.

## Where is Ishan Kishan? Fans question wicketkeeper's absence for England T20Is

**NEW DELHI :** Fans questioned selectors on the absence of wicketkeeper-batter Ishan Kishan for the upcoming T20I series against England. The BCCI (Board of Control for Cricket in India) announced a 15-member squad for the five-match T20I series on Saturday, January 11. The selectors picked Sanju Samson and Dhruv Jurel as the two wicketkeeping options for the series as they ignored Ishan Kishan.



The southpaw last played for India in November 2023 during the T20I series against Australia. Kishan scored two half-centuries in his last three innings in the shortest format and hasn't played a single game since then. The 26-year-old even lost his central contract after reportedly not complying with the directives of the board for playing domestic cricket. In the Syed Mushtaq Ali Trophy 2024-25, he scored 161 runs from six innings at an average of 32.20 and a strike rate of 167.70 with one half-century. In the 32 T20I matches played in his career so far, Kishan has scored 796 runs at an average of 25.67 and a strike rate of 124.37 with six half-centuries. The selectors picked Dhruv Jurel as the second wicketkpeeing option who replaced Jitesh Sharma in the team. Jurel has played two T20Is in his career so far and has scored six runs. Kishan's fans weren't happy with his non-selection and even questioned Jurel's credentials as a T20I player. Meanwhile, India will play five T20Is against England beginning from January 22 followed by a three-match ODI series. Mohammed Shami has marked his return to the Indian team after the ODI World Cup 2023 as he made his T20I comeback after over two years.

## 'Hardik Pandya Was Leading India In Rohit Sharma's Absence...': Selectors Asked For Official Clarification On Allrounder's Demotion

**NEW DELHI :** Former India opener Aakash Chopra has said that the Ajit Agarkar-led selection committee should explain why allrounder Hardik Pandya has been driven out from the T20I leadership group. Pandya last led India during the West Indies T20I series in 2023 post which Suryakumar Yadav was elevated to the role before Rohit Sharma's return for the Afghanistan series at home in 2024 and the T20 World Cup last year.

With Rohit announcing T20I retirement after leading India to world cup triumph, Suryakumar has been handed over the reins of the team in the shortest format.



Allrounder Axar Patel was recently named as the vice-captain for the upcoming five-match T20I series against England at home which raises further questions over why Pandya has been sidelined.

"It's a development that needs an official word," Chopra wrote on X (formerly Twitter) while responding to a query. "He (Pandya) was leading India in Rohit's absence. Now, he's not even the VC. I'd like to hear from the selectors about their thought process."

It's been speculated that Pandya's fitness concerns could've played a key role in the selectors picking Suryakumar as Rohit's successor.

Pandya picked up a freak injured midway through the 2023 ODI World Cup which pushed him away from action for nearly four months. He made his competitive return in a local T20 tournament in February 2024. However, since then he captained Mumbai Indians in IPL, played a key role in India's triumph at the T20 World Cup, played in a home series against Bangladesh between the tours of Sri Lanka and South Africa.

## Zheng wins Australian Open 2025 first round before storm causes havoc

**NEW DELHI :** Olympic champion Zheng Qinwen overcame a sluggish start to blast into the Australian Open second round on Sunday as storms caused havoc ahead of Aryna Sabalenka beginning her quest for a historic third consecutive crown. Fifth seed Zheng, last year's losing finalist, had the honour of playing the first point on centre court at the opening Grand Slam of the season against Romania's 110th-ranked Anca Todoni She came through unscathed 7-6 (7/3), 6-1 on Rod Laver Arena but was clearly rusty after opting not to play a warm-up event. Zheng had three set points on-serve at 5-3 in the first set, but allowed Todoni to come roaring back before closing her down in the tiebreak then racing through the second set. "The first match is always not easy," she said. "Just happy to get through the match, the tiebreak and find my rhythm." The 22-year-old enjoyed a breakthrough 2024 with her Australian Open exploits helping spur her to Olympic gold --- beating Iga Swiatek on the way -- and three WTA titles.



While Zheng was able to play, the action on outside courts at Melbourne Park was halted barely an hour after it started when storms rolled in that turned the sky black.

# इंदिरा आयव्हीएफचे मुंबईतील १२वे हॉस्पिटल भिवंडीमध्ये सुरू



● भिवंडी, विवेक गुंजाळ :

वंध्यत्वाने प्रभावित जोडप्यांना आता उपचारासाठी दूरच्या शहरांमध्ये प्रवास करण्याची गरज नाही. भारतातील सर्वात मोठी फर्टिलिटी ट्रीटमेंट साखळी इंदिरा आयव्हीएफने फर्स्ट फ्लोर, सूर्या एक्सीलेंसी, मौजे नारपोली, जीपी पारसिक बँकेच्या वर, भिवंडी येथे आपले अत्याधुनिक केंद्र सुरू केले आहे. हॉस्पिटलचे उद्घाटन इंदिरा आयव्हीएफ भांडुपचे वरिष्ठ कार्यकारी संचालक डॉ. रिनॉय श्रीधरन आणि भिवंडी प्रमुख डॉ. सोनम मनोज तुरकर यांनी फित कापून केले. उच्च यश दर, रुग्णाच्या समस्येनुसार उपचार आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरासाठी प्रसिद्ध असलेल्या इंदिरा आयव्हीएफने महाराष्ट्रातील २८वे हॉस्पिटलचे उद्घाटन केले आहे. ग्रुपचे भारतात १६० पेक्षा जास्त हॉस्पिटल्स चालू आहेत. इंदिरा आयव्हीएफकडून उपचार घेऊन आतापर्यंत एक लाख साठ हजार पेक्षा जास्त जोडप्यांचे यशस्वी आयव्हीएफ प्रक्रियेतून झाले आहे. या प्रसंगी इंदिरा आयव्हीएफ ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक आणि सह-संस्थापक डॉ. नितिज मुर्डिया म्हणाले, "आम्ही भिवंडीमध्ये आमचे नवीनतम हॉस्पिटल सुरू करून आनंदित आहोत, जेणेकरून कुटुंब पूर्ण करण्याची इच्छा असलेल्या जोडप्यांना अत्याधुनिक उपचार सहाय्य प्रदान करता येईल. आकडेवारीनुसार, भारतात १०-१५ टक्के जोडपी वंध्यत्वाशी झुंजत आहेत. इंदिरा आयव्हीएफचे मिशन अशा जोडप्यांमध्ये वंध्यत्वाशी संबंधित चुकीच्या माहिती आणि धारणांना दूर करणे आणि योग्य माहितीचा प्रसार करण्यात मदत करणे आहे. आम्हाला समजते की वंध्यत्व जोडप्यांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम करू शकते आणि म्हणूनच आम्ही एकाच छताखाली सर्व वंध्यत्व उपचार प्रदान करण्यासाठी वचनबद्ध आहोत." इंदिरा आयव्हीएफ भांडुपचे वरिष्ठ कार्यकारी संचालक डॉ. रिनॉय श्रीधरन म्हणाले की, भारतात फर्टिलिटी उपचारांबद्दल जागरूकता खूपच मर्यादित आहे. ६ पैकी १ जोडप्याला संतती प्राप्त करण्यात समस्या येतात.

# बारामतीत कार्यक्रमाच्या निमंत्रणावरून नाराजी नाट्य

## खासदार सुप्रिया सुळे यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

● पुणे, अभिजीत येरल्लू :



बारामती तालुक्यातील अंजनगाव येथील महावितरण उपकेंद्राच्या उद्घाटन समारंभावरून नाराजी नाट्य घडले. बारामती लोकसभा मतदारसंघाच्या खासदार सुप्रिया सुळे यांना ऐनवेळी निमंत्रण दिल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली. या उपकेंद्राच्या कोनशिलेच्या उद्घाटनाच्या निमित्ताने खासदार सुळे आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीनंतर बारामतीत पहिल्यांदाच एकत्र आले. मात्र, त्यांनी एकमेकांशी संवाद साधला नाही. खासदार सुळे या मुख्य कार्यक्रमाला उपस्थित न राहता निघून गेल्या.

लोकप्रतिनिधींना निमंत्रण पाठवताना राजशिष्टाचार पाळला न गेल्याने त्यांनी मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून नाराजी दर्शविली. या पत्राची प्रत त्यांनी जिल्हाधिकारी आणि महावितरणच्या अधीक्षक अभियंत्यांना पाठविली आहे. लोकसभा निवडणुकीपासून खासदार सुळे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार एकत्र व्यासपीठावर आलेले नाहीत. विधानसभा निवडणुकीपूर्वी पुण्यातील एका शासकीय बैठकीच्या निमित्ताने ते एकत्र आले होते.

अंजनगाव येथील महावितरणच्या उपकेंद्राच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमात दोघे एकत्र दिसले. त्यांनी एकमेकांशी स्मितहास्य केले. मात्र संवाद साधला नाही. कोनशिलेचे उद्घाटन झाल्यावर खासदार सुळे या मुख्य कार्यक्रमाला उपस्थित न राहता निघून गेल्या. याबाबत खासदार सुळे म्हणाल्या, 'बारामती लोकसभा मतदारसंघाचे आपण लोकप्रतिनिधी आहोत. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी लोकप्रतिनिधींना निमंत्रण पाठवताना राजशिष्टाचार पाळावा. किमान २४ तास आधी निमंत्रण मिळाले, तर त्या अनुषंगाने दौऱ्याचे नियोजन करता येते. अंजनगाव येथील कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका थोड्या वेळापूर्वी मिळाली. दौरे किंवा कार्यक्रम पूर्वनियोजित असतात. महत्त्वाच्या सार्वजनिक कार्यक्रमाची किमान २४ तासांपूर्वी कल्पना दिली, तर नियोजित कार्यक्रमात बदल करता येणे शक्य आहे. संबंधित यंत्रणांनी याची नोंद घ्यावी.

# मुंबईचा डॉ. कार्तिक करकेरा नाशिक मविप्र मॅरेथॉन -२०२५ चा विजेता

● नाशिक, सचिन कदम :

**नाशिक येथील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेतर्फे १२ जानेवारी रोजी आयोजित नवव्या राष्ट्रीय 'नाशिक मविप्र मॅरेथॉन २०२५' शर्यतीचे विजेतेपद मुंबई येथील डॉ. कार्तिक करकेरा याने पटकावले. कार्तिकने ४२.१९५ किलोमीटर अंतर २ तास २० मिनिटात पूर्ण करुन या मॅरेथॉनमधील नवा विक्रम आपल्या नावावर केला. गेल्या वर्षी उत्तर प्रदेशच्या अक्षय कुमारने २ तास २६ मिनिटे ०१ सेकंद या वेळेत मॅरेथॉन पूर्ण केली होती.**



कडाक्याच्या थंडीत पहाटे पावणे सहापासून नवव्या राष्ट्रीय 'नाशिक मविप्र मॅरेथॉन २०२५' आणि १४ व्या राज्यस्तरीय नाशिक मविप्र मॅरेथॉनला सुरुवात झाली. धावपटूंचा उत्साह ओसंडून वाहत होता. मुख्य मॅरेथॉनव्यतिरिक्त वेगवेगळ्या १४ गटांमध्ये झालेल्या शर्यतीत चिमुकल्यांपासून ते वयोवृद्धांपर्यंत धावपटूंनी सहभाग नोंदविला. भारतीय हॉकी संघातील खेळाडू तथा रियो ऑलिम्पिकपटू रेणुका यादव या प्रमुख पाहुण्या होत्या. आयोजन समितीचे अध्यक्ष तथा मविप्रचे सरचिटणीस अ‍ॅड. नितीन ठाकरे, संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वास मोरे, चिटणीस दिलीप दळवी आदींसह इतर संचालकांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्य मॅरेथॉनला हिरवा झेंडा दाखविण्यात आला. डॉ. कार्तिकने २ तास २० मिनिटे अशी वेळ नोंदवत प्रथम क्रमांकासह मॅरेथॉनचे एक लाख ५१ हजार रुपयांचे पारितोषिक पटकावले. नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील सिकंदर तडाखे या धावपटूने २ तास २० मिनिटे २ सेकंद अशी वेळ नोंदवत दुसऱ्या क्रमांकाचे एक लाख रुपयांचे तर, वर्धा जिल्ह्यातील विक्रम बंगरिया या धावपटूने २ तास २० मिनिटे १२ सेकंद अशी वेळ नोंदवत तृतीय क्रमांकाचे ७५ हजार रुपयांचे पारितोषिक पटकावले.

# राष्ट्रवादीच्या मंत्र्यांचा जनता संवाद उपक्रम

## आठवड्यातील तीन दिवस मंत्री पक्षाच्या मुख्यालयात



● मुंबई, विशाल पाटील :

विधानसभा निवडणुकीतील यशानंतर राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार) जनाधार वाढवण्यावर भर दिला असून त्यासाठी जनता संवाद उपक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार पक्षाचे मंत्री आठवड्यातून तीन दिवस प्रदेश कार्यालयात उपस्थित राहून पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि जनतेशी संवाद साधून त्यांचे प्रश्न सोडवणार आहेत. मंत्रालयासमोरील 'राजगड' या पक्षाच्या प्रदेश कार्यालयात राष्ट्रवादीचे मंत्री मंगळवार ते गुरुवार असे उपस्थित राहणार आहेत. प्रत्येक मंत्र्यांना दिवस आणि वेळ नेमून दिली आहे. वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ हे मंगळवार ते गुरुवार असे आठवड्यातील तीन दिवस सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत जनतेला भेटतील. प्रत्येक मंगळवारी अन्न आणि नागरी पुरवठामंत्री धनंजय मुंडे तसेच युवक, क्रीडा कल्याण आणि अल्पसंख्याक विकासमंत्री दत्तात्रय भरणे त्याचबरोबर मदत आणि पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील हे प्रदेश कार्यालयात उपस्थित राहणार आहेत. बुधवारी सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, अन्न व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ आणि महिला व बालविकास आदिती तटकरे तर गुरुवारी राज्यमंत्री इंद्रनील नाईक हे पक्ष कार्यालयात सर्वसामान्य नागरिकांना भेटून त्यांच्या अडचणी जाणून घेणार आहेत.

# सुधाकर घारे यांनी केला कर्जत - खालापूरातील पत्रकारांचा सन्मान



● कर्जत, गणेश बागडे :

खालापूर मतदारसंघातील विविध प्रश्नावर आवाज उठवणे, सामाजिक कार्याला प्रसिद्धी देऊन योग्य न्याय देण्याचे काम पत्रकार अखंडितपणे करत असतात. जनता आणि लोकशाहीमधील दुवा म्हणून पत्रकारांकडे बघितले जाते म्हणून पत्रकार दिनाचे औचित्य साधत रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनी शहर आणि तालुक्यातील पत्रकार बांधवांचा सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात केला आहे.

सुधाकर घारे यांच्या जनसंपर्क कार्यालय कर्जत येथे पत्रकारांचा सन्मान सोहळा पार पडला याप्रसंगी माजी जि.प.सभापती अशोक भोपतराव,एकनाथ धुळे,ज्येष्ठ पत्रकार भाई ओव्हाळ,विजय मांडे,खालापूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे,कर्जत प्रेस क्लबचे अध्यक्ष राहुल देशमुख,राकेश खराडे ,सामाजिक कार्यकर्ते बळीराम देशमुख व्यासपीठावर उपस्थित होते.

राजमाता जिजामाता आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्ताने अभिवादन करण्यात आले तसे पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्याही प्रतिमेचे पूजन सुधाकर घारे यांनी केले.

# 'झेड मोढ' बोगद्याभोवती सुरक्षा व्यवस्थेत वाढ; पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते उद्या उद्घाटनाची शक्यता



● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

जम्मू-काश्मीरच्या गांदरबल जिल्ह्यातील 'झेड मोढ' बोगद्याभोवतीच्या सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली आहे. १३ जानेवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन होण्याची शक्यता असल्याचे अधिकाऱ्यांनी शनिवारी सांगितले. या उद्घाटन समारंभानंतर मोदींची एक सार्वजनिक सभा आयोजित केली जात आहे. त्यामुळे श्रीनगरसह खोऱ्यातील अनेक भागांत सुरक्षा वाढवण्यात आली आहे. पंतप्रधानांसाठी असलेल्या विशेष सुरक्षा दलाच्या (एसपीजी) कर्मचाऱ्यांनी या भागाचा ताबा घेतल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. तोपर्यंत हे ठिकाण सर्वसामान्यांसाठी बंद राहणार आहे.

ड्रोनद्वारे हवाई आणि तांत्रिक देखरेख केली जात असून शोधपथके तसेच गस्तही वाढवण्यात आल्याची माहितीही अधिकाऱ्यांनी दिली.

### वैशिष्ट्ये

- श्रीनगर-लेह राष्ट्रीय महामार्गावरील 'झेड मोढ' बोगद्यासाठी २,४०० कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे.
- ६.५ किमी लांबीचा हा बोगदा असून त्यामुळे श्रीनगर ते लडाख हा मार्ग बाराही महिने खुला राहील.
- प्रकल्पाचे काम मे २०१५ मध्ये सुरू झाले आणि गेल्या वर्षी पूर्ण झाले.
- ८,६५० फूट उंचीवर स्थित बोगदा द्विपदरी असून गगनगीर आणि सोनमर्ग दरम्यान संपर्क प्रस्थापित करण्याकरिता महत्त्वपूर्ण आहे.

# अभिनेता सयाजी- मित्रवर्य शिवाजीच्या गप्पांनी जागतिक मराठी संमेलनात रंगत

● सातारा, दिगंबर जाधव:




जागतिक मराठी अकादमी आणि रयत शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सातारा येथे विसाव्या जागतिक मराठी संमेलनाच्या निमित्ताने अभिनेते सयाजी शिंदे आणि त्यांचे जिवाभावाचे गावाकडील मित्र शिवाजी शिंदे यांच्या बहारदार मुलाखतीने संमेलनाची रंगत वाढली. वेळे कामथी गावातील अनेक किस्से श्रोत्यांना मनमुराद करत होते

ज्येष्ठ पत्रकार विजय चोरमारे यांनी या मुलाखतीतून माणसाच्या मनाच्या सच्चेपणाचे दर्शन घडले. माणूस यशाची वाट चालत कितीही पुढे गेला तरी त्याने क्षणभर थांबून आपण कुठून कुठपर्यंत चालत आलो, या प्रवासाकडे वळून बघायचे असते. मागे राहिलेल्या जीवाभावाच्यांना न विसरतात आपल्या बरोबर घ्यायचे असते. जगात कोणतीच गोष्ट शाश्वत नाही. सत्ता ,पैसा , संपत्ती , प्रसिद्धी तात्कालीक असून या सगळ्यांपेक्षा माणसांमध्ये असलेले प्रेम हेच चिरकाल टिकणारे असते असा सूर या दोघाही जिवलग मित्रांनी मुलाखतीत आळवला.

आयुष्यात एक टप्पा असा येतो, हव्या असलेल्या सर्व गोष्टी लाभतात. माणसाने किमान तेव्हा तरी उघड्या डोळ्यांनी आपला भोवताल न्याहाळला पाहिजे. सह्याद्री देवराई या प्रकल्पाच्या जन्माची कथाही यावेळी त्यांनी कथन केली. माणूस कुणाच्याही आयुष्याला पुरत नसतो. याची तीव्र जाणीव आईचं वय झाल्यानंतर झाली. त्यानंतर मात्र आईची बीज तुला करून ते झाडांचे बी महाराष्ट्रभर विखुरले. आणि यातून सह्याद्री देवराई प्रकल्प उभा राहिला.

शिवाजी शिंदे हा बालपणीचा जिवलग मित्र, सगळीकडे फिरून आल्यानंतर पुन्हा गावात या मित्राच्या मिठीत आपलेपणा, प्रेम आणि मातीचा ओलावा जाणवला. आज सोशल मीडियावर आमच्या व्हिडिओची धूम आहे. सयज्या आणि शिवज्या च्या निमित्ताने आम्ही आयुष्य समरसून जगत आहोत.

शिवाजी शिंदे यांनीही मित्र व अभिनेता सयाजी शिंदे यांच्याबरोबरच्या असंख्य आठवणींना उजाळा दिला. माणूस कितीही मोठा झाला तरी त्याने पायाखालची माती विसरू नये. हे सयाजी कडून शिकावे असेही शिवाजी शिंदे म्हणाले. जगात शेवटी माणसाने माणसाबरोबर माणुसकीने वागणे यापेक्षा मोठी गोष्ट असत नाही असा मोलाचा सल्लाही शिवाजी शिंदे यांनी दिला.

- रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन आणि संमेलनाचे स्वागताध्यक्ष चंद्रकांत दळवी यांनी दोघांसाठी सन्मान व स्वागत केले.
- स्नेहल दामले यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या मैत्रीच्या नातेसंबंधांमुळे मैत्रीला लागणारे अभिनेते सयाजी शिंदे व शिवाजी शिंदे सध्या दोस्ती व दुनियादारी जगतातील खरे हिरो ठरले आहेत.

# जिजाऊ जयंतीनिमित्त सिंदखेड राष्ट्रीय, राज्य महामार्गावरील वाहतुकीत बदल

● बुलढाणा, राकेश गायकवाड :

महाराष्ट्राची अस्मिता, प्रेरणा आणि स्वराज्य जननी राजमाता जिजाऊंची रविवारी जयंती. यानिमित्त मातृतीर्थ सिंदखेडराजामध्ये जिल्ह्यासह राज्य भरातील हजारो भाविक दाखल होऊन राजमातेला मानाचा मुजरा करतात. यानिमित्त कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी वाहतुकीत मोठे बदल करण्यात आले.

सिंदखेड राजा येथे रविवारी, १२ जानेवारी रोजी राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सव सोहळा मोठया प्रमाणावर साजरा होतो. मिळेल त्या वाहनाने हजारो भक्त सिंदखेडराजात दाखल होतात . यामुळे वाहतूक कोंडी होण्याची दाट शक्यता राहते. यामुळे कायदा व सुववस्थेच्या प्रश्न निर्माण होऊ नये याकरीता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक .७५३(सी) पुणे-नागपूर वरील व राज्य महामार्ग क्रमांक ५१ सिंदखेडराजा -देऊळगाव राजावरील वाहतूक मध्ये बदल करण्यात आले आहे . या दोन मार्गावर मोठ्या संख्येत मालवाहतूक करणारी वाहने येजा करतात. यामुळे हजारो जिजाऊ भक्तांची आणि त्यांच्या वाहनांची अडचण होऊ नये म्हणून जड वाहतुक अन्य मार्गांनी वळविण्यात आली आहे.

अकरा जानेवारीचे रात्री १ वाजेपासून हे बदल



करण्यात आले असून आज १२ जानेवारीचे रात्री १२ वाजेपावेतो पर्यायी मार्गाने जड वाहनाची वाहतूक|होणार आहे. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी यासंदर्भातील आदेश निर्गमित केले आहे.

सध्याचा प्रचलित मार्ग जालना-सिंदखेडराजा-मेहकर ऐवजी पर्यायी मार्ग जालना-देऊळगाव राजा-चिखली-मेहकरचा वापर करावा लागत आहे. मेहकर-सिंदखेडराजा-जालना ऐवजी मेहकर-चिखली दे.राजा-जालना या पर्यायी मार्गाचा वापर करावा लागणार आहे . तसेच देऊळगाव राजा ते सिंदखेड राजा- सिंदखेड राजा ते देऊळगांव राजा या मार्गावरील जड वाहतुक बंद ठेवण्यात आली आहे. सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकविरुद्ध मुंबई पोलीस वाहतुक अधिनियम १९५१ चे कलम १३१ अन्वये कार्यवाही करण्यात येईल.